# फलश्रृती अंदाज

ठाणे शहराला विकसित शहर बनविण्यासाठी ठाणे महानगरपालिका गेल्या काही वर्षापासून अर्थसंकल्पीय नियोजन व प्रशासनातील गतिमानतेबरोबर नियोजनबध्द विकास करण्याचा प्रयत्न करीत आहे.

महानगरपालिका विविध उपक्रम, विविध प्रकल्प, सामुहिक व वैयक्तिक लाभाच्या योजना राबवित असून शहरातील नागरिकांना जास्तीत जास्त सेवा देत आहे. हे करीत असताना आपण जे अर्थसंकल्पाच्या वेळी विमोचन करतो त्याचा कुठेतरी लेखाजोखा मांडला जावा व त्या कारणाने प्रशासकीय जबाबदारीची जाणीव सर्व प्रशासनातील अधिकारी व कर्मचारी यांना व्हावी आणि महानगरपालिकेत काम करणारे सर्व पदाधिकारी व सदस्य यांना आपण केलेल्या नियोजनातून नागरिकांना कोणकोणत्या सुविधा उपलब्ध होणार आहेत याचे मूल्यमापन करता यावे या दृष्टीने सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पीय अंदाजातून काय फलश्रृती मिळणार आहे याची माहिती मिळावी या ध्येयाने स्वतंत्रपणे फलश्रृती अंदाज दर्शविण्यात आलेले आहेत.

# रस्ते, वाहतूक व पूल

## प्रस्तावित अर्थसंकल्पीय अंदाजातील तरतुदींची ठळक वैशिष्टये व महत्वाच्या निर्धारित फलश्रुती

**१.** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण १४ अन्वये सार्वजनिक रस्ते, पूल बांधणे, ते सुस्थितीत ठेवणे, त्यात फेरफार व सुधारणा करणे आणि रस्त्यांवरील वाहने आणि पादचारी यांचा प्रवास सुरक्षित व सुसहय व्हावा यादृष्टीने इतर उपाययोजना करणे हे महानगरपालिकेचे अनिवार्य कर्तव्य आहे.

ठाणे शहराला विकसित शहर बनविण्याची आकांक्षा असल्याने वाहनांची वाहतूक आणि पादचा-यांचा प्रवास सुरळीतपणे होण्यासाठी रस्ते विषयक पायाभूत सुविधा आंतरराष्ट्रीय दर्जाच्या करणे ही महत्वाची निर्धारित फलश्रुती मिळण्यासाठी खालील क्षेत्रांवर भर देण्यात आलेला आहे.

**भर देण्यात आलेली क्षेत्रे**

- शहरातील रस्त्यांचे सुशोभीकरण करुन ते आकर्षक बनविणे.
- वाहतूक व्यवस्थेची दर्जोन्नती आणि वाहतूक बेटांचा विकास करणे.
- मॉडेल रस्ते तयार करणे व या अंतर्गत Carriage Way सह साईड शोल्डर, पदपथांचे सौंदर्यीकरण, दिशादर्शक फलक, सीसीटीव्ही कॅमेरे, वायफाय सुविधा, रस्ते सफाई. इत्यादी कामे करणे.
- सार्वजनिक वाहनतळ विकसित करणे.
- शहरातील महत्वाच्या रस्त्यावरील वाहतुकीचे सुरळीत व सुरक्षित नियंत्रण होण्यासाठी तांत्रिकदृष्टया योग्य लेन मार्किंग पेंटींग करणे.
- शहरातील सिग्नल व चौक या ठिकाणी पादचा-यांना सुरक्षितपणे ये-जा करण्यासाठी योग्य ठिकाणी झेब्रा क्रॉसिंगची व्यवस्था करणे.
- रस्त्यावरील दुभाजक, रेलिंग, जनपथ दुरुस्त करुन पादचा-यांना चालण्याजोगे करणे.
- सुरक्षित व सुरळीत वाहतूक नियमनाकरिता शहरातील रस्त्यांचा अभ्यास करुन पार्किंग व्यवस्था करणे.
- वाहतुकीचे नियम मोडणा-या वाहन चालकांविरुध्द कारवाई करणेकामी शहर पोलीस वाहतूक विभागाच्या सहकार्याने अद्ययावत संगणकीय प्रणाली तयार करुन त्याची अंमलबजावणी करणे.

**२. उपरोक्त क्षेत्रांतील साध्यासाठी आगामी वर्षात खालील उपक्रम हाती घेण्याचे प्रस्ताविले आहे.**

| भर देण्यात आलेली क्षेत्रे | उपक्रम | प्रस्तावित तरतुदी (कोटीत) |
|---|---|---|
| ♦ सुयोग्य आखणी करुन आणि आधुनिक तंत्राचा वापर करुन वाहतुकीचा दर्जा सुधारण्या करीताआंतराष्ट्रीय दर्जाचे रस्ते तयार करणे<br>♦ मिसिंग लिंक तयार करणे<br>♦ सॉप्ट मोबिलिटी | १. विविध रस्त्यांचे नुतनीकरण व रुंदीकरण | रु.६०.०० |
| | २. नवीन मॉडेल रस्ते विकसित करणे | रु.१८.३० |
| | ३.Ultra Thin White Topping (UTWT)पध्दतीने रस्त्यांचे काँक्रिटीकरण करणे | रु.१२५.०० |
| | ४. विकास आराखडयातील रस्ते बांधणे | रु.९०.०० |
| | ५. मिसिंग लिंक जोडणे | रु.६०.०० |
| | ६. सिमेंट कॉंक्रीटचे रस्ते बांधणे | रु.८.०० |
| | ७. सॉफ्ट मोबोलिटी | रु.४.०० |
| | ८. कोस्टल रोड | रु.१.०० |
| | ९. कळवा लिंक रोड | रु.१.०० |
| | १०. श्रीनगर ते गायमुख रस्ता (फूट हिल रोड) | रु.१.०० |
| ♦ वाहतूक व्यवस्थेची दर्जोन्नती करणे | १. पादचारी पूल / सब वे | रु.१५.०० |
| | २. कळवा खाडीवर पूल | रु.४०.०० |
| | ३. रस्त्यावरील पुलांचे रुंदीकरण व विकास | रु.३.०० |
| | ४. खारेगाव येथील लेव्हल क्रॉसिंगवर | रु.८.०० |
| | ५.उड्डाणपूल व ग्रेड सेपरेटर | रु.२५.०० |
| | ६. एकात्मिक नागरी वाहतूक सर्वेक्षण व सुविधा | रु.३.०० |
| | ७.भुयारी पादचारी मार्ग | रु.१.०० |
| | ८. दिवा स्टेशन परिसर सुधारणा | रु.०.५० |
| | ९. रेतीबंदर येथे भुयारी मार्ग | रु.०.५० |
| | १०. दिवा रेल्वे फाटकावर ओव्हरब्रिज बांधणे | रु.०.१० |
| | ११. ठाणे पूर्व स्टेशन परिसर सुधारणा | रु.१.३० |
| ♦ सार्वजनिक वाहनतळ | ठाण्यामध्ये सार्वजनिक वाहनतळांसाठी जागा विकसित करण्याकरिता बृहत आराखडा तयार करणे. | |
| | १. पार्किग सुविधा | रु.३.०० |
| | २.स्मार्ट पार्किंग | रु.५.०० |
| | ३. ट्रॅफिक साईनेज | रु.०.५० |
| | ४.शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे स्मारकाजवळ नाल्यावर पार्किंग व्यवस्था | रु.०.४० |

| भर देण्यात आलेली क्षेत्रे | उपक्रम | प्रस्तावित तरतुदी (कोटीत) |
|---|---|---|
| | ५. ऑफ स्ट्रीट पार्किंग | रु.०.१० |
| | ६. वागळे इस्टेट नाला बंदिस्त करुन पार्किंग व्यवस्था | रु.१.०० |
| ♦ शहरातील महत्वाच्या रस्त्यावर पदपथ बांधणे व प्रवेशद्वारे | १. जनपथ नुतनीकरण / रस्ते सुशोभिकरण | रु.५.०० |
| | २. चौक सुशोभिकरण | रु.०.३५ |
| | ३.ज्ञानसाधना कॉलेज ते एल.आय.सी ऑफिसपर्यंत सुशोभिकरण | रु.२.०० |
| | ४. आनंदनगर, विटावा व मॉडेला येथे प्रवेशद्वारे | रु.२.०० |
| ♦ भविष्यकालीन योजना | १. इनलॅण्ड वॉटर वे | रु.२.५० |
| | २. ठाणे मनोरुग्णालयाशेजारी रेल्वे स्थानक अनुषंगिक विकास | रु.०.४० |
| | ३. श्री स्थानक लोकमार्ग प्रकल्प | रु.१.०० |
| | ४. मोनोरेल व हायडेन्सिटी कॉरीडॉर्स विकास | रु.१.०० |
| | ५.ठाणे अंतर्गत मेट्रो प्रकल्प | रु.२०.०० |
| | ६.अंतर्गत जलवाहतूक | रु.१०.०० |

**३. अपेक्षित परिणाम**

- पाणी निचरा न होणा-या भागांमध्ये दिर्घकाळ टिकणारे युटीडब्ल्युटी पध्दतीचे कॉंक्रीट रस्ते बांधण्यात येतील व विकास आराखडयातील रस्त्यांचे नुतनीकरण व रुंदीकरण तसेच मिसिंग लिंक जोडण्यात येतील.
- पदपथांची निर्मिती, बांधकाम व सुधारणा केल्यामुळे पादचा-यांकरिता स्वतंत्र मार्गिका उपलब्ध होणार असल्याने व सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून पादचारी वाहतूक व्यवस्थेत लक्षणिय सुधारणा होईल.
- नवीन पूल व पादचारी पूल बांधण्यात येणार असल्यामुळे अपघातांच्या प्रमाणात घट होईल आणि वाहन चालकांसाठी येणारे अडथळे कमी होतील व त्यामुळे वाहतूक कोंडी कमी होऊन वेळेची, इंधनाची व पैशाची बचत होणार आहे.
- रस्त्यांवरील दुभाजक, दिशादर्शक व मार्गदर्शक फलक इत्यादीमुळे वाहतूक नियंत्रित व सुरळीत होऊन अपघाताचे प्रमाण कमी होईल.
- रोड फर्निचर, आकर्षक व दर्जेदार वाहतूक बेटांमुळे शहराचे सौंदर्य द्विगुणित होईल.
- झेब्रा क्रॉसिंग व दिशादर्शक सिग्नलिंग फलक यामुळे पादचा-यांचे व्यवस्थित नियमन होईल.
- सॉफ्ट मोबीलिटी मध्ये इलेक्ट्रीसिटीवर चालणा-या वाहनांचा वापर करण्यासाठी स्वतंत्र मार्गिका करणे.

- डिजिटल डिस्प्ले व क्लोज सर्किट कॅमे-यांमुळे गुन्हेगारांना शोधण्यास मदत होईल.
- अद्ययावत संगणकीय वाहतूक प्रणालीमुळे वारंवार वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणा-यांविरुध्द दिर्घकालीन कारवाई करणे सोपे जाईल.
- उड्डाणपुलाच्या बांधकामामुळे मोठया जंक्शनवरील वाहतूक कोंडी कमी होऊन हवा प्रदूषण, ध्वनीप्रदूषणाची पातळी कमी होण्यास मदत होऊन वेळेची व इंधनाची बचत होईल.

## ४. सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पीय अंदाजामधील खर्चाच्या प्रस्तावित तरतुदी

| **अ) भांडवली अर्थसंकल्पीय अंदाज** | **(तरतुदी कोटीत)** |
|---|---|
| १) वाहतुकीचा दर्जा सुधारण्याकरीता आंतरराष्ट्रीय दर्जाचे रस्ते | रु.३६८.३० |
| २) वाहतूक व्यवस्थेची दर्जोन्नती करणे | रु.९७.४० |
| ३) सार्वजनिक वाहनतळ | रु.१०.०० |
| ४) शहरातील महत्वाच्या रस्त्यावर पदपथ | रु.९.३५ |
| ५) भविष्यकालिन योजना | रु.३४.९० |
| **एकूण (अ)** | **रु.५१९.९५** |
| **ब) महसुली अर्थसंकल्पीय अंदाज** | |
| १) रस्ते दुरुस्ती | रु.५.०० |
| २) रस्ते मार्किंग पेटींग | रु.१.०० |
| ३) चरांचे पुर्नपृष्ठीकरण | रु.२५.०० |
| ४) पदपथ दुरुस्ती | रु.१.०० |
| ५) मोठया पुलांची दुरुस्ती | रु.१.०० |
| ६) कळवा पूल दुरुस्ती | रु.२.०० |
| ७) सॅटीस निगा व देखभाल | रु. ०.३० |
| ८) पार्किंग धोरणाची अंमलबजावणी | रु.३.०० |
| ९) भुयारी मार्गाची देखभाल दुरुस्ती | रु.०.२५ |
| १०) वाहतूक नियमन | रु.०.८० |
| ११) चौक व फाऊंटन दुरुस्ती | रु.०.१० |
| **एकूण (ब)** | **रु.३९.४५** |
| **एकूण प्रस्तावित अर्थसंकल्पीय तरतूद (अ + ब)** | **रु.५५९.४०** |

***

# महापालिका बाजार

## प्रस्तावित अर्थसंकल्पीय अंदाजातील तरतुदींची ठळक वैशिष्टये व महत्वाच्या निर्धारित फलश्रृती

**१.** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण १९ अन्वये सार्वजनिक बाजार बांधणे आणि त्यांचे परिरक्षण करणे व बाजारांचे नियमन करणे हे महानगरपालिकेचे अनिवार्य कर्तव्य आहे.

महापालिकेच्या ताब्यात असलेल्या मालमत्ता, मार्केट इत्यादीचे परिरक्षण करण्याकरिता स्थावर मालमत्ता व बांधकाम विभाग कार्यरत आहे.

**भर देण्यात आलेली क्षेत्रे**

- खारेगाव, विटावा, कळवा नाका, गावदेवी मच्छी मार्केट बांधणे.
- खाजगी मंडयांच्या धर्तीवर विद्यमान महानगरपालिकेच्या मंडयांचा पुर्नविकास आणि आधुनिकिकरण करणे
- महात्मा फुले मार्केट पुर्नविकास
- नागरिकांना दैनंदिन गरजेच्या वस्तू त्यांच्या सोयीनुसार एकाच छताखाली खरेदी करणे शक्य व्हावे म्हणून बाजारांची सुविधा उपलब्ध करुन देणे
- वर्तकनगर मार्केट
- मुंब्रा येथे फ्लोटींग मार्केट
- तीन हात नाका येथे मिनीमॉल बांधणे

**२. उपरोक्त क्षेत्रांतील साध्यासाठी आगामी वर्षात खालील उपक्रम हाती घेण्याचे प्रस्ताविले आहे.**

| भर देण्यात आलेली क्षेत्रे | उपक्रम | प्रस्तावित तरतुदी (कोटीत) |
|---|---|---|
| ● खाजगी मंडयांच्या धर्तीवर विद्यमान महानगरपालिकेच्या मंडयांचा पुर्नविकास आणि आधुनिकिकरण करणे. | १. हॉकर्स प्लाझा<br>२. मार्केट बांधणे | रु.०.५०<br>रु.६.५० |

| | | |
|---|---|---|
| ● नागरिकांना दैनंदिन गरजेच्या वस्तू त्यांच्या सोयीनुसार एकाच छताखाली खरेदी करणे शक्य व्हावे म्हणून बाजाराची सुविधा उपलब्ध करुन देणे. | ३. मच्छी मार्केट बांधणे<br>४.महात्मा फुले मार्केट<br>पुर्नविकास<br>५.फ्लोटींग मार्केट<br>६. मिनी मॉल बांधणे | रु.१.००<br>रु.१.००<br>रु.१.००<br>रु.१०.००<br>रु.२.५० |

**३. अपेक्षित परिणाम**

- स्थानिक जनतेला अद्ययावत मार्केटचा लाभ मिळेल. तसेच सुलभ रितीने एकाच ठिकाणी भाजीपाला खरेदी करता येईल. नागरिकांचे शारिरीक व मानसिक श्रम वाचतील.
- महापालिकेच्या आर्थिक उत्पन्नात वाढ होईल.
- विस्थापितांना त्यांच्या हक्कानुसार (नियमाने) गाळे उपलब्ध होतील.
- मार्केट बांधल्यामुळे रस्त्यावरील फेरीवाल्यांची संख्या कमी होऊन, रस्ते रहदारीस व वाहतुकीस मोकळे होतील. तसेच रस्त्यावरील विद्रुपिकरणामध्ये घट होणार आहे.

**४. सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पातील अंदाजामधील खर्चाच्या प्रस्तावित तरतुदी**

**(रुपये कोटीत)**

| | |
|---|---|
| अ) भांडवली अथसंकल्पीय अंदाज | **२१.५०** |
| ब) महसुली अथसंकल्पीय अंदाज | **०.२५** |
| **एकूण प्रस्तावितलेले अर्थसंकल्पीय तरतदू (अ + ब)** | **२१.७५** |

***

# सुधार योजना

## प्रस्तावित अर्थसंकल्पीय अंदाजातील तरतुदींची ठळक वैशिष्टये व महत्वाच्या निर्धारित फलश्रृती

महानगरपालिकेने १९३३ साली ताब्यात घेतलेल्या पुर्वीच्या मुंबई सुधार विश्वस्त मंडळाच्या मालमत्ता आणि इतर संपादीत केलेल्या मालमत्ता यांचे परिरक्षण करणे ही बाब प्रामुख्याने सुधार योजनेमध्ये अंतर्भूत आहे. सदर योजनेबाबतची कार्यवाही मालमत्ता खात्यामार्फत पार पाडण्यात येते.

**१.** ठाणे महानगरपालिकेने ताब्यात घेतलेल्या / संपादीत केलेल्या मालमत्तांचे योग्य प्रकारे परिरक्षण करणे आणि नियोजनबध्द पुर्नविकास करणे ही सुधार योजनेची महत्वाची निर्धारीत फलश्रृती आहे. त्या दृष्टीने खालील क्षेत्रांवर भर देण्यात आलेला आहे.

| **भर देण्यात आलेली क्षेत्रे** | |
|---|---|
| | ◆ आरक्षित भूखंड विकसित करणे.<br>◆ स्मारक उभारणे<br>◆ प्रभागातील मालमत्तांचा विकास |

**२. उपरोक्त क्षेत्रातील साध्यासाठी आगामी वर्षात खालील उपक्रम हाती घेण्याचे प्रस्ताविले आहे.**

| भर देण्यात आलेली क्षेत्रे | उपक्रम | प्रस्तावित तरतुदी (कोटीत) |
|---|---|---|
| ◆ महापालिका क्षेत्रातील प्रभाग समिती क्षेत्रात तसेच काही दुर्गम भागात नागरी मुलभूत सुविधा व पायाभुत सुविधा विकसित करणे. | १. नगरसेवक निधी | रु.३७.६२ |
| | २. मागासवर्गीय निधी | रु.२३.०० |
| | ३. एकात्मिक प्रभाग विकास कार्यक्रम | रु.१२.०० |
| | ४. दलित वस्ती सुधारणा | रु.१.०० |
| | ५. संरक्षक भिंत बांधणे | रु.२.३५ |
| | ६. छत्रपती शिवाजी महाराज व बाबासाहेब आंबेडकर स्मारक उभारणे. | रु.२.०० |
| | ७. आदिवासी पाडयांमध्ये मुलभूत सोयी सुविधा | रु.५.०० |
| | ८. ठक्करबाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा योजना | रु.०.५० |
| | ९. पायाभूत सुविधांसाठी विशेष अनुदान | रु.५.०० |
| | १०. आमदार निधी | रु.५.०० |
| | ११. खासदार निधी | रु.५.०० |
| | १२. अल्पसंख्यांक बहुल विकास निधी | रु.०.२० |
| | १३. दिवा विभाग एकात्मिक सुधारणा प्रकल्प | रु.५.०० |
| | १४. विकास आराखडयातील आरक्षणे विकसित करणे | रु.०.५० |

**३. अपेक्षित परिणाम**

➢ महापालिकेच्या विविध प्रभागात मुलभूत सुविधा पुरविण्यात येतील व त्यामध्ये सुधारणा करण्यात येतील. सदर मुलभूत सुविधा विकसित केल्यानंतर सदर भागातील नागरिकांना आरोग्याच्या, वाहतुकीच्या तसेच विरंगुळयाच्या दृष्टीकोनातून राहणीमानाचा स्तर उंचावेल.

**४. सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पीय अंदाजामधील खर्चाच्या प्रस्तावित तरतुदी**

**(रुपये कोटीत)**

| | |
|---|---|
| अ) भांडवली अथसंकल्पीय अंदाज | रु.१०४.१७ |
| ब) महसुली अथसंकल्पीय अंदाज | -- |
| **एकूण प्रस्ताविलेले अर्थसंकल्पीय तरतदू (अ + ब)** | **रु.१०४.१७** |

***

# इमारत व तत्सम सुधार योजना

## प्रस्तावित अर्थसंकल्पीय अंदाजातील तरतुदींची ठळक वैशिष्टये व महत्वाच्या निर्धारित फलश्रृती

महापालिका हद्दीत असणा-या विविध मालमत्तांचे प्रभाग कार्यालये इमारती, समाज मंदीर इत्यादी, परिरक्षण करणे, त्यांच्या दुरुस्त्या करणे व आवश्यकतेप्रमाणे नव्या इमारती, विविध प्रकारच्या वास्तू उभ्या करणे व त्यांचे परिरक्षण करणे या बाबी प्रामुख्याने सुधार योजनेत अंतर्भूत होतात. या योजनेबाबतची कार्यवाही सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत पार पाडण्यात येते.

**१.** महापालिकेच्या ताब्यात असलेल्या / संपादीत केलेल्या मालमत्तांचे योग्य प्रकारे परिरक्षण करणे आणि नियोजनबध्द पुनर्विकास करणे तसेच मनोरंजनासाठी विविध प्रकारच्या वास्तु उभ्या करणे ही सुधार योजनेची निर्धारीत फलश्रृती आहे. या दृष्टीने खालील क्षेत्रावर भर देण्यात आला आहे.

**भर देण्यात आलेली क्षेत्रे**

- एमएमआरडीए रेंटल योजनेमधील वाणिज्य गाळे खरेदी करुन रस्ता रुंदीकरणामध्ये बाधित विस्थापितांना देणे.
- महापालिका इमारतींच्या व सदनिकांच्या दुरुस्त्या व परिरक्षण करणे.

**३. उपरोक्त क्षेत्रातील साध्यासाठी आगामी वर्षात खालील उपक्रम हाती घेण्याचे प्रस्ताविले आहे.**

| **भर देण्यात आलेली क्षेत्रे** | **उपक्रम** | **प्रस्तावित तरतुदी (कोटीत)** |
|---|---|---|
| ● प्रभाग कार्यालय बांधणे | १) प्रभाग कार्यालय बांधणे | रु.६.०० |
| | २) इमारती बांधणे | रु.४.०० |
| | ३) बहुउद्देशीय इमारत बांधणे | रु.३.०० |
| | ४) महापौर निवासस्थान बांधणे | रु.१.०० |
| | ५) आयुक्त निवासस्थान बांधणे | रु.१.०० |
| | ६) क्लस्टरसाठी संक्रमण शिबीर | रु.३.०० |
| | ७) इमारत बांधणे | रु.३.०० |
| | ८) मुख्यालय नुतनीकरण | रु.१.५० |
| | ९) एमएमआरडीए कडून रेंटल दुकाने खरेदी | रु.५.०० |
| | १०) नवीन महापालिका भवन | रु.१.०० |
| | ११) सभागृहाचे नुतनीकरण | रु.०.२० |
| | १२) हजेरी शेड विकसित करणे | रु.०.५० |
| | १३) कार्यशाळा इमारत बांधणे | रु.१.०० |

**४. सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पीय अंदाजामधील खर्चाच्या प्रस्तावित तरतुदी**

**(रुपये कोटीत)**

| | |
|---|---|
| अ) भांडवली अथसंकल्पीय अंदाज | रु.२८.२० |
| ब) महसुली अथसंकल्पीय अंदाज | रु.५.४० |
| **एकूण प्रस्ताविलेले अर्थसंकल्पीय तरतदू (अ + ब)** | **रु.३७.४५** |

# आरोग्य

## प्रस्तावित अर्थसंकल्पीय अंदाजातील तरतुदींची ठळक वैशिष्टये व महत्वाच्या निर्धारित फलश्रृती

**१.** ठाणे शहरामधील राहिवाशांच्या आरोग्याच्या दृष्टीकोनातून विविध उपक्रम राबविण्यात येत असून ठाणे शहरातील सर्व परिसरातील नागरिकांना सोयीस्कर होईल या दृष्टीने सर्व प्रभागात दवाखाने बांधणे, मोकाट कुत्र्यांचे पुनर्वसन केंद्र, बायोगॅस प्लँट बांधणे, गटारे बांधणे, स्मशानभूमी बांधणे व इतर कामांचा समावेश करणे.

**भर देण्यात आलेली क्षेत्रे**

- आरोग्य व स्वच्छता राखण्यासाठी योग्य सुविधा करणे
- कौसा हॉस्पिटल कार्यान्वीत करणे
- वर्तकनगर आनंदीबाई जोशी रुग्णालयाची पुनर्बांधणी
- शीळ येथे आरोग्य केंद्र बांधणे

**२. उपरोक्त क्षेत्रांतील साध्यासाठी आगामी वर्षात खालील उपक्रम हाती घेण्याचे प्रस्ताविले आहे.**

| भर देण्यात आलेली क्षेत्रे | उपक्रम | प्रस्तावित तरतुदी (कोटीत) |
|---|---|---|
| • प्रभागातील दवाखाने बांधणे व अस्तित्वातील मोठया हॉस्पिटलचे नुतनीकरण करणे | १. दवाखाना बांधणे | रु.१२.०० |
| | २.कौसा येथे दवाखाना बांधणे | रु.२०.०० |
| | ३. मोकाट जनावरे व श्वान नियंत्रण केंद्र | रु.०.५० |
| | ४. घोडबंदर परिसरात रुग्णालय | रु.०.५० |
| | ५. गटार / पायवाट बांधणे | रु.५.०० |
| • आरोग्य व स्वच्छता राखण्यासाठी योग्य सुविधा करणे. | ६. सार्वजनिक शौचालये व मुता-या बांधणे | रु.१६.०० |
| | ७. महिलांसाठी स्वच्छतागृह बांधणे | रु.१.०० |
| | ८.भारत स्वच्छता अभियानांतर्गत स्वच्छालय बांधणे | रु.१.०० |

| भर देण्यात आलेली क्षेत्रे | उपक्रम | प्रस्तावित तरतुदी (कोटीत) |
|---|---|---|
| • ठाणे महापालिका क्षेत्रातील स्मशानभुमीचे नुतनीकरण | ९. एकात्मिक स्मशानभूमी / कब्रस्तान नुतनीकरण | रु.९.०० |
| | १०. दवाखाने / रुग्णालय दुरुस्ती | रु.२.५० |
| | ११. छत्रपति शिवाजी महाराज रुग्णालय दुरुस्ती | रु.१५.०० |

**३. अपेक्षित परिणाम :**

- मुंब्रा कौसा परिसरातील नागरिकांना १०० खाटांचे रुग्णालय उपलब्ध होईल.
- प्रभागातील अस्तित्वातील आरोग्य केंद्रांची दुरुस्ती व नुतनीकरण केल्यानंतर सदर परिसरातील नागरिकांना चांगली सुविधा उपलब्ध होऊन उत्स्फुर्त वातावरण निर्मिती झाल्याने आरोग्य केंद्रातील कर्मचा-यांच्या कामाच्या क्षमतेमध्ये वाढ होणार आहे.
- छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात ठाणे शहराव्यतिरिक्त ठाणे जिल्हयातून येणा-या रुग्णांचे प्रमाण जास्त असून सदर रुग्णालयाचे कायापालट झाल्यानंतर सदर ठिकाणी येणा-या रुग्णांना उत्तम दर्जाची पायाभूत सेवा उपलब्ध होणार आहे.
- स्थानिक नागरिकांना अद्ययावत स्मशानभूमी उपलब्ध होईल.
- अद्ययावत स्मशानभुमीमध्ये विद्युत शवदाहिनी निर्माण केल्यास पर्यावरणाचे संतुलन राखण्यास मदत होईल.

**४. सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पीय अंदाजामधील खर्चाच्या प्रस्तावित तरतुदी**

**(रुपये कोटीत)**

| | |
|---|---|
| अ) भांडवली अथसंकल्पीय अंदाज | रु.६५.०० |
| ब) महसुली अथसंकल्पीय अंदाज | रु.३१.६४ |
| **एकूण प्रस्ताविलेले अर्थसंकल्पीय तरतदू (अ + ब)** | **रु.९६.६४** |

***

# क्रिडा व मनोरंजन

## प्रस्तावित अर्थसंकल्पीय अंदाजातील तरतुदींची ठळक वैशिष्टये व महत्वाच्या निर्धारित फलश्रुती

महापालिका हद्दीत असणा-या विविध क्रीडा संकुल, नाटयगृह यांच्या दुरुस्त्या करणे व आवश्यकत्येप्रमाणे नव्या इमारती, कलादालन, तलाव मनोरंजनासाठी विविध प्रकारच्या वास्तू उभ्या करणे व त्यांचे परिरक्षण करणे या बाबी प्रामुख्याने सुधार योजनेत अंतर्भूत होतात. या योजनेबाबतची कार्यवाही सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत पार पाडण्यात येते.

१. महापालिकेच्या ताब्यात आलेल्या / संपादित केलेल्या मालमत्तांचे योग्य प्रकारे परिरक्षण करणे आणि नियोजनबध्द पुर्नविकास करणे तसेच मनोरंजनासाठी विविध प्रकारच्या वास्तू उभ्या करणे, ठाण्याच्या पूर्व भागाकडील कौसा मुंब्रा हा भाग मुंबई महानगर प्रदेशाच्या जवळजवळ मध्यभागी असून या भागाकडील विकास पाहाता मुंब्रा कौसा हा भाग विकासाच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा ठरत आहे. या भागाचा सर्वंकष विकास करण्याच्या दृष्टीकोनातून अद्ययावत क्रिडा संकुल उभारण्याचे काम महानगरपालिकेने पूर्ण केले आहे.

**२. उपरोक्त क्षेत्रातील साध्यासाठी आगामी वर्षात खालील उपक्रम हाती घेण्याचे प्रस्ताविले आहे.**

| भर देण्यात आलेली क्षेत्रे | उपक्रम | प्रस्तावित तरतुदी (कोटीत) |
|---|---|---|
| ★ महापालिकेच्या मालमत्तांचा व इतर संपादीत मालमत्तांचा पुर्नविकास करणे व सरंक्षण करणे. | १) कौसा क्रिडा संकुल | रु.४.०० |
| | २) क्रीडाप्रेक्षागृह नुतनीकरण | रु.१२.०० |
| | ३) गडकरी रंगायतन | रु.५.०० |
| | ४) डॉ. काशिनाथ घाणेकर नाटयगृह | रु.०.५० |
| | ५) सिंथेटिक ट्रॅक बांधणे | रु.०.७० |
| | ६) मैदान विकास | रु.४.०० |
| | ७) खेळांसाठी आरक्षित मैदाने विकसित करणे. | रु.६.०० |
| ★ महापालिकेच्या विविध क्रीडा संकुल व नाटयगृहाचे नुतनीकरण करणे व दर्जोन्नती करणे. | ८) दादोजी कोंडदेव क्रीडा प्रेक्षागृह येथे शूटींग रेंज | रु.०.२० |
| | ७) शॅलो वॉटर पार्क ॲन्ड वॉटर फ्रंट डेव्हलपमेंट /चौपाटी विकास | रु.१०.०० |
| | १०) मिनी स्टेडीयम नुतनीकरण | रु.०.०५ |
| | ११) साहित्य खरेदी | रु.०.०१ |
| | १२) मेंटल हॉस्पीटल परिसरात क्रीडा संकुल उभारणे | रु.०.५० |

| | | |
|---|---|---|
| ★ विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करुन खेळाडूंना प्रोत्साहन देणे. | १३) शरदचंद्र पवार मिनी स्पोटर्स कॉम्पलेक्स अनुषंगिक कामे | रु.०.५० |
| | १४) उपवन तलाव सुशोभिकरण व ॲम्पी थिएटर / बनारस घाट | रु.८.०० |
| | १५) मासुंदा तलाव सुशोभिकरण | रु.६.०० |
| | १६) जॉगर्स ट्रॅक | रु.१.०० |
| | १७) येऊर हिल्स पर्यटन विकास | रु.२.०० |
| | १८) पारसिक रेतीबंदर चौपाटी | रु.२.०० |
| | १९) रायलादेवी तलाव परिसर विकास | रु.२.०० |
| | २०) एकात्मिक तलाव सौंदर्यीकरण | रु.६.०० |
| | २१) गायमुख येथे विसर्जन घाट | रु.५.०० |
| | २२) आऊटडोअर फिटनेस साहित्य बसविणे | रु.१.०० |
| | २३)मानपाडा परिसरात महिलांसाठी व्यायामशाळा | रु.०.५० |
| | २४) मेंटल हॉस्पिटल महिलांसाठी व्यायामशाळा | रु.२.६२ |
| | २५) वॉर मेमोरीयल | रु.१.०० |
| | २६) उपवन जिमखाना | रु.४.०० |
| | २७) कळवा येथे ॲम्पी थिएटर | रु.२.०० |

**३. अपेक्षित परिणाम**

- ठाणे शहरातील नागरीकांकरीता मनोरंजनासाठी उच्च दर्जाची सोयी सुविधा पुरविणे.
- ठाणे महापालिका व आजुबाजूच्या परिसरातील खेळाडूंना अद्ययावत सोयी-सुविधांनी युक्त असे क्रीडा संकुल व क्रीडा विषयक सुविधा उपलब्ध करुन देणे.
- परिसराचा विकास होऊन नागरीकांचे राहणीमान उंचावेल.
- क्रीडा, मनोरंजन व आरोग्याशी संबंधित सुविधा विकसित केल्यानंतर ठाणे शहरातील नागरिकांच्या आरोग्याचा दर्जामध्ये सुधारणा होणार आहे.

**४. सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पीय अंदाजामधील खर्चाच्या प्रस्तावित तरतुदी**

**(रुपये कोटीत)**

| | |
|---|---|
| अ) भांडवली अथसंकल्पीय अंदाज | रु.८७.५७ |
| ब) महसुली अथसंकल्पीय अंदाज | रु.२०.७६ |
| **एकूण प्रस्ताविलेले अर्थसंकल्पीय तरतदू (अ + ब)** | **रु.१०८.३३** |

***

# पाणी पुरवठा विभाग

## प्रस्तावित अर्थसंकल्पीय अंदाजातील तरतुदींची ठळक वैशिष्टये व महत्वाच्या निर्धारित फलश्रृती

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे प्रकरण १३ व कलम ६३ (२०) अन्वये ठाणे शहरातील नागरिकांना शुद्ध आणि स्वच्छ पाणी पुरविण्यासाठी पाणी पुरवठा प्रणालीची उभारणी, कार्यान्वयन आणि तिचे परिरक्षण करणे हे ठाणे महानगरपालिकेच्या कार्यापैकी एक मुख्य कार्य आहे. पाणी पुरवठा योजना तयार करणे, राबविणे, वितरण व्यवस्थेचे परिचालन, परिरक्षण व व्यवस्थापन करण्याची जबाबदारी महानगरपालिकेची आहे.

**१.** ठाणे महानगरपालिका हद्दीतील वाढत्या लोकसंख्येसाठी शहरातील वितरण व्यवस्थेचे विस्तार व मजबुतीकरण करणे वितरण व्यवस्थेची कार्यक्षमता वाढविण्यासाठी व्यवस्थेत सुधारणा करणे व शहरातील नागरिकांना सम प्रमाणात पाण्याचे वाटप तसेच स्वच्छ व पुरेसा पाणी पुरवठा करणे यासाठी खालीलप्रमाणे भर देण्यात आलेल्या क्षेत्राची निवड करण्यात आली आहे .

- ठाणे महानगराच्या पाणी पुरवठ्यात वाढ
- वितरण व्यवस्थेचे विस्तार व मजबुतीकरण
- परिणामात्मक मागणी व्यवस्थापन उपाययोजना
- पाणी व ऊर्जा संवर्धन व जलसाक्षरता अभियान
- जलकुंभाची शास्त्रोक्त पद्ध्तीने सफाई
- विहिरी व कुपनलिकांवर आर.ओ प्लॅन्ट बसविणे
- पाणी गळती शोधणे
- मुंब्रा व दिवा प्रभागात पाणी वितरण व्यवस्थेचे रिमॉडेलिंग करणे.

**२. उपरोक्त क्षेत्रातील साध्यासाठी आगामी वर्षात खालील उपक्रम हाती घेण्याचे प्रस्ताविले आहे.**

| भर देण्यात आलेली क्षेत्रे | उपक्रम | प्रस्तावित तरतुदी (कोटीत) |
|---|---|---|
| वितरण व्यवस्थेचे विस्तार व मजबुतीकरण | मुंब्रा व दिवा विभागात पाणी वितरण व्यवस्थेचे रिमॉडेलिंगचे काम प्रस्तावित करण्यात आले आहे. या प्रकल्पामध्ये वहन व्यवस्था जलकुंभ, संप व पंप हाऊस बांधणे, पंपींग मशिनरी बसविणे, जलवाहिन्या टाकणे | रु. ८०.०० |
| जलकुंभ बांधणे | मुंब्रा येथे जलकुंभ बांधणे | रु.५.०० |
| जलवाहिन्या टाकणे | आवश्यकतेनुसार विविध ठिकाणी जलवाहिन्या टाकणे | रु.४.५० |

| | | |
|---|---|---|
| पाणी पुरवठयाची आवश्यक कामे | १) मागासवर्ग व दलित वस्तीत पाणी पुरवठयसाची कामे<br>२) संयंत्रे व साहित्य खरेदी<br>३) २४X७ पाणी पुरवठा योजना<br>४) आपत्कालीन कामे<br>५) कुपनलिका खोदणे<br>६) फिल्टरेशन प्लॅन्ट<br>७) पाणी लेखापरिक्षण<br>८) ऊर्जा लेखापरिक्षण<br>६) वाहने खरेदी | रु.६.५०<br>रु.३.००<br>रु.१०.००<br>रु.१.००<br>रु.१.००<br>रु.३.००<br>रु.१०.००<br>रु.३.००<br>रु.१.०० |
| परिणामात्मक मागणी व्यवस्थापन उपाययोजना | जलवाहिन्या, जलकुंभ दुरुस्ती, टँकरने पाणी पुरवठा करणे, विहिरी साफसफाई व दुरुस्ती, विजेचा खर्च, पाणी खरेदी, कुपनलिका दुरुस्ती, १०० द.ल.लि. योजनेची देखभाल व दुरुस्ती, जलकुभ परिचालन, पाईपलाईन ब्रीज पेंटींग, जलकुंभाची साफसफाई, पाणी टंचाईवर अभ्यास समिती व इतर अनुषंगिक खर्च | रु.१७९.७२ |
| पाणी संवर्धन व जल साक्षरता अभियान | ठाणे महानगरपालिकेमार्फत सर्व नवीन इमारतींना पावसाच्या पाण्याचे संवर्धन करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. तसेच महापालिकेच्या मालमत्तांना टप्प्याटप्प्याने पावसाच्या पाण्याचे संवर्धन करण्यात येणार आहे. | रु.०.५० कोटी |

## ३. अपेक्षित परिणाम

- वरील प्रमाणे सोयी सुविधा उपलब्ध करुन दिल्यानंतर ठाणे महापापालिका क्षेत्रातील सर्व नागरिकांना आवश्यक प्रमाणात, वेळेवर सुरळीतपणे पाणी पुरवठा होणार असून मिटरींग पध्दतीमुळे पाण्याच्या अपव्यय टाळण्यास मदत होऊन पाण्याचे महत्व व पाणी वापराबाबतची शिस्त निर्माण होईल.
- विहिरी व कुपनलिकांवर आर.ओ प्लॅन्ट बसविल्यामुळे शुध्द व पिण्यायोग्य पाणी उपलब्ध होऊन पाणी टंचाई व पाणी पुरवठा बंद असताना सदर सुविधेचा नागरिकांना फायदा होणार आहे.

## ४. सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पीय अंदाजामधील खर्चाच्या प्रस्तावित तरतुदी

**(रुपये कोटीत)**

| | |
|---|---|
| अ) भांडवली अथसंकल्पीय अंदाज | रु.१३४.५० |
| ब) महसुली अथसंकल्पीय अंदाज | रु.१७९.७२ |
| **एकूण प्रस्ताविलेले अर्थसंकल्पीय तरतदू (अ + ब)** | **रु.३१४.२२** |

# घनकचरा व्यवस्थापन विभाग

## प्रस्तावित अर्थसंकल्पीय अंदाजातील तरतुदींची ठळक वैशिष्टये व महत्वाच्या निर्धारित फलश्रृती

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे प्रकरण १८ मधील तरतुदींनुसार ठाणे शहरातील कचरा साफ करणे, संकलन करणे, वाहतूक करुन त्याची विल्हेवाट लावणे हे महानगरपालिकेचे अनिवार्य कर्तव्य असून ही जबाबदारी महानगरपालिकेचे घनकचरा व्यवस्थापन विभाग पार पाडते.

**१.** घनकचऱ्याचे शास्त्रोक्त पध्दतीने व्यवस्थापन करुन कचऱ्याचा साधनस्त्रोत म्हणून वापर करुन शहरामध्ये उच्च दर्जाची स्वच्छता राखणे ही या क्षेत्राच्या बाबतीतील महत्त्वाची निर्धारित फलश्रृती आहे. त्यासाठी खालील क्षेत्रांवर भर देण्यात आलेला आहे.

**भर देण्यात आलेली क्षेत्रे**

१. झोपडपट्टयांमधील कचऱ्याचे घरगुती पातळीवर वर्गीकरण आणि घरोघरी जाऊन कचरा गोळा करुन कचरा संकलकांमार्फत कचरा संकलन सुरु करणे.

२. स्वच्छता सेवा पुरविली न जाणारे परिसर स्वच्छता सेवेखाली आणणे.

३. स्वच्छता व साफसफाई प्रक्रियेची कार्यक्षमता सुधारणे.

४. कचराकुंडया बसविणे व स्वच्छतेसंबंधी जनतेमध्ये जागृती निर्माण करुन शहर कचरामुक्त राखणे.

५. वाहन ताफ्यात सुधारणा व बंदिस्त वाहनांमधून कचऱ्याची अधिक कार्यक्षमतेने वाहतूक करणे.

६. आधुनिक पध्दतीने कचरा उचलणे व वाहतूक करण्यासाठी रिफ्युज कॉम्पॅक्टर्स आऊट सोर्सिंग पध्दतीने कार्यान्वित करणे.

७. हस्तांतरण स्थानक विकसित करणे.

८. विकेंद्रीत पध्दतीने घनकच-याची विल्हेवाट लावणे.

- बायो कंपोस्टिंग
- फ्युएल ब्रिकेटस् निर्मिती
- मेकॅनिकल कंपोस्टिंग
- बायोमिथेन गॅस प्रकल्प

१०. अवेळी कचरा टाकणा-या नागरिकांना व शहर अस्वच्छ करणा-या नागरिकांना कचरा विल्हेवाटीची शिस्त लागण्याकरीता बिट मार्शल नेमण्यात आलेले आहेत.

## २. कार्यनुरुपता दर्शके

| आऊटपूट इंडिकेटर्स<br>कव्हरेज इंडिकेटर्स | | आउटपूट इंडिकेटर्स<br>फस्ट स्टेज इंडिकेटर्स | |
|---|---|---|---|
| १ | घनकचरा संकलन, क्षेत्र आणि लोकसंख्या | १ | स्वच्छतेमध्ये वाढ-दुर्गंधी, भटके प्राणी यांच्या बाबतीतील दर्जात्मक मुल्यांकन (प्रमाण १-५) |
| २ | घनकचरा वाहतूक (किमी) | २ | घनकचरा व्यवस्थापन प्रचलनासाठी स्वयं वित्त प्रबंध |
| ३ | घनकचरा संकलन, वाहतूक प्रमाण | | |
| | **आपरेशनल इंडिकेटर्स** | | **फायनल स्टेज आऊटकम** |
| ४ | वर्गीकृत घनकचरा | ३ | रस्त्यावर भटके प्राणी नसणे |
| ५ | घनकचऱ्यांची यांत्रिकी हाताळणी (%) | ४ | शून्य कचरा |
| ६ | घनकचरा वाहून नेण्याची क्षमता (टन/दिवस) | ५ | शाळा आणि कामाची ठिकाणे तसेच इतर वेळी कचरा नसल्यामुळे आरोग्यदायी राहणीमान |
| ७ | घनकचरा वाहतुकीचा कालावधी (तास/फेऱ्या) | ६ | वायू प्रदुषणाची प्रमाणे |
| ८ | घनकचरा पुनर्प्रक्रिया (%) | ७ | सेवा तरतुदींमधील आंतरराष्ट्रीय मानके (प्रमाण १-५) |

**२. उपरोक्त क्षेत्रांतील साध्यासाठी आगामी वर्षात खालील उपक्रम हाती घेण्याचे प्रस्ताविले आहे.**

| | भर देण्यात आलेली क्षेत्रे | उपक्रम | तरतुदी |
|---|---|---|---|
| १ | कचऱ्याचे घरगुती पातळीवर वर्गीकरण आणि घरोघरी जाऊन कचरा गोळा करणे या योजनेचा विस्तार | १. घरोघरी जाऊन कचरा संकलित करण्याच्या पध्दतीत सुधारणा करुन सध्याच्या ९६ टक्क्यांवरुन किमान ९८ टक्क्यापर्यंत वाढ करण्याचे प्रस्तावित | रु.२९ |
| | | २. कचरा गोळा करणे आणि त्याची वाहतूक करणे यासाठी सर्वसमावेशक प्रभाग समिती निहाय कंत्राटे | |
| | | ३. कचऱ्याचे ओला व सुका कचरा असे वर्गीकरण करण्याच्या योजनेची ठोस अंमलबजावणी | |
| २ | स्वच्छता सेवा पुरविली न जाणारे परिसर स्वच्छता सेवेखाली आणणे. | सर्व गलिच्छ वस्त्यांमध्ये कचरा वेचकांमार्फत कचरा संकलन योजना सुरु करणे. | रु.४.०० |
| ३ | स्वच्छते बाबत प्रचार व प्रसार | स्वच्छते बाबत प्रचार व प्रसार | रु.२.५० |

| | भर देण्यात आलेली क्षेत्रे | उपक्रम | तरतुदी |
|---|---|---|---|
| ४ | नाले सफाई | पावसाळयामध्ये शहरात पाणी साचून जिवित व वित्त हानी होऊ नये याकरीता लहान मोठया नाल्यांची सफाई करणे. | रु.८.०० |
| ५ | साफसफाई वाहने / कंटेनर व हातगाडया खरेदी | कचरा संकलन करणेसाठी हातगाडया व कंटेनर व वाहने खरेदी करणे. | रु.३.०० |
| ६ | स्वच्छता व साफसफाई प्रक्रियेच्या कार्यक्षमतेत सुधारणा करणे. | १.स्वच्छ परिसर योजनेची अंमलबजावणी<br>२. प्रमुख रस्ते खाजगी कंत्राटदाराकडून साफ करणे.<br>३. रस्त्यावरील दुभाजक व कोटींग साफ करणे.<br>४. प्रसाधनगृहे स्वच्छ करण्यासाठी महिला मंडळे, सामाजिक संस्थांची नियुक्ती करणे. | रु.६०.००<br>रु.३.००<br>रु.८.०० |
| ७ | घनकचरा जागा भूमीभरण | | रु.२.०० |
| ८ | खाजगीकरणातून कचरा वाहतूक | हस्तांतरण स्थानक येथे जमा होणा-या कच-याचे क्षेपणभूमीपर्यंत वाहतकू करणे | रु.१०.०० |
| ९ | हस्तांतरण स्थानक विकसित करणे | | रु.१५.०० |
| १० | यांत्रिकी पध्दतीने कच-यापासून खत निर्मिती प्रकल्प | | रु.११.०० |
| ११ | विकेंद्रीत पध्दतीने घनकचरा प्रक्रिया प्रकल्प | | रु.४०.०० |
| १२ | अत्याधुनिक साफसफाई मशीन खरेदी | | रु.१७.०० |

**३. अपेक्षित परिणाम**

- घरोघरी जाऊन कचरा संकलित करण्याची योजना किमान ९६ ते ९८ टक्क्यांपर्यंत राबविली जाईल.
- झोपडपट्टी विभागातील निर्माण होणारा घनकचरा घंटागाडयापर्यंत आणून त्याची वाहतूक करणे.
- शहरातील कचऱ्याची वाहतूक बंदिस्त कंटेनर्स व घंटागाडयामधून केल्यामुळे रस्त्यावर दुर्गंधी पसरणार नाही.

- कचरा कुंडया हटविणे आणि गलिच्छ वस्त्या नसलेल्या विभागांमध्ये सार्वजनिक कचराकुंडया विरहीत ठाणे उद्दिष्ट साध्य करण्यात येईल.
- कचरा वाहतूक वाहनांसाठी जी.पी.एस यंत्रणेची अंमलबजावणी केल्यामुळे कचरा संकलनाच्या कामावर प्रभावीपणे देखरेख ठेवणे शक्य होईल.
- ओला व सुका कचरा असे वर्गीकरण केल्यामुळे क्षेपणभूमींची क्षमता व आर्युमान वाढेल.
- क्षेपणभुमीचा विकास व व्यवस्थापन केल्याने पर्यावरणाच्या हानीला प्रतिबंध होईल.
- कचरा गोळा करणे व त्याची वाहतूक करणे त्याच्या सुव्यवस्थापनामुळे ठाणे शहर अधिकाधिक स्वच्छ व आकर्षक होईल.
- रस्ते व परिसर स्वच्छ राखल्याने ठाणे रोगमुक्त होऊन नागरिकांकरिता आरोग्यदायी वातावरण निर्माण होईल.

**४. सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पीय अंदाजामधील खर्चाच्या प्रस्तावित तरतुदी**

**(रुपये कोटीत)**

| | |
|---|---|
| अ) भांडवली अथसंकल्पीय अंदाज | रु.८६.०० |
| ब) महसुली अथसंकल्पीय अंदाज | रु.१२६.५० |
| **एकूण प्रस्तावलेले अर्थसंकल्पीय तरतदू (अ + ब)** | **रु.२१२.५०** |

## आरोग्य व वैद्यकीय सेवा

**प्रस्तावित अर्थसंकल्पीय अंदाजातील तरतुदींची ठळक वैशिष्टये व महत्वाच्या निर्धारित फलश्रृती**

**भर देण्यात आलेली क्षेत्रे**

- कान, नाक, घसा विभागात ऑडिओमेट्री रुम उभारणे
- आयसोलेशन वॉर्ड उभारणे
- रुग्णालयात २४ तास रक्त चाचणी तपासणीसाठी इमरजन्सी लॅब उभारणे
- नवीन विषाणुंचे व टी.बी च्या जंतुची तपासणी व त्यानुसार सुयोग्य औषध प्रक्रियेसाठी नवीन लॅबोरेटरी उभारणे
- माता व नवजात बाल रुग्णालय निर्माण करणे
- मध्यवर्ती औषधी भांडाराचे नुतनीकरण करणे

## २. अपेक्षित परिणाम

- ठाणे महापालिका क्षेत्रात नागरिकांना आर्थिक क्षमतेनुसार सवलतीच्या दरात डायलेसिस सुविधा उपलब्ध होईल.
- आरोग्य केंद्र येथे पॅथॉलॉजी सुविधा उपलब्ध होईल.
- आयसीयू विभागासाठी मॉनिटर व नवजात अतिदक्षता विभागासाठी मशिनरी खरेदी करण्यात येणार आहे.
- पॅथॉलॉजी उपकरणे व फिजिओथेरेपी उपकरणे खरेदी केल्याने रुग्णांना फायदा होईल.
- डायबेटिस औषधे उपलब्ध होतील.
- कॉकलिअर इम्लान्ट शस्त्रक्रियेमुळे मूक बधिर मुलांना ऐकू येणार आहे.

## ३. सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पीय अंदाजामधील खर्चाच्या प्रस्तावित तरतुदी

**(रुपये कोटीत)**

| | |
|---|---|
| अ) भांडवली अथसंकल्पीय अंदाज | रु.४५.५० |
| ब) महसुली अथसंकल्पीय अंदाज | रु.३९.९५ |
| **एकूण प्रस्ताविलेले अर्थसंकल्पीय तरतदू (अ + ब)** | **रु. ८५ .४५** |

***

# प्रदूषण नियंत्रण कक्ष

### प्रस्तावित अर्थसंकल्पीय अंदाजातील तरतुदींची ठळक वैशिष्टये व महत्वाच्या निर्धारित फलश्रृती

| अ.क्र. | प्रकल्प | तपशील |
|---|---|---|
| १ | **ग्रीनी प्रकल्प** | ठाणे महानगरपालिकेने थर्माकोल प्रकल्प, E Waste प्रकल्प, वुड वेस्ट टु ब्रिकेट, हॉटेल वेस्ट टू बायोगॅस, ड्रायवेस्ट कलेक्शन सेंटर प्रकल्प, बांधकाम व तोडफोड प्रकल्प कार्यान्वित केले. या विविध प्रकल्पासाठी कचरा जमा होण्यासाठी सामान्य नागरिकांना ग्रीन कॉल ही सेवा उपलब्ध करुन दिली. या सेवेमध्ये सोसायटी मध्ये जमा होणार ई वेस्ट, थर्माकोल वेस्ट, प्लास्टिक वेस्ट, गार्डन वेस्ट जमा झाल्यास व्हॉट्सअप नंबर वर माहिती दिल्यास सर्व कचरा महापालिकेमार्फत जमा करण्यात येतो. त्याअन्वये खालील प्रमाणे वेस्ट जमा होऊन त्यांचे पुनर्चक्रीकरण करण्यात आले आहे. |

| | | |
|---|---|---|
| | | ई वेस्ट १६६० किलो<br>थर्माकोल ४५ टन<br>वुड वेस्ट १२९२.५ टन<br>हॉटेल वेस्ट ८५४ टन<br>बांधकाम आणि तोडफोड वेस्ट ३२७७५ टन<br>ठाणे शहरामध्ये वर्तकनगर, उथळसर, माजिवडा मानपाडा प्रभाग समिती मध्ये नागरिकांमध्ये कचरा वर्गीकरणाबाबत जनजागृती करण्यासाठी ड्रायवेस्ट कलेक्शन सेंटर उभारण्यात आले आहे. सदर प्रकल्प १० वर्ष कालावधीसाठी PPP तत्वावर राबविण्यात आला आहे. |
| २ | **पर्यावरण सद्यस्थिती दाखवणारे मोबाईल ॲप** | ठाणे शहरात ४ ठिकाणी हवा सर्वेक्षण केले जाते. सदर हवा सर्वेक्षणाची माहिती नागरिकांना उपलब्ध करुन देण्यासाठी मोबाईल ॲप तयार केले आहे. सदरमध्ये तापमान, पर्जन्यमान $SO_२$, $NO_२$, RSPM इत्यादी माहिती दिली जाते. |
| ३ | **कादंळवन लागवड** | ठाणे महानगरपालिका क्षेत्रात ६०००० कादंळवन वृक्षांची कोलशेत खाडी किनारी, कोपरी व खर्डी येथे लागवड करण्यात आली आहे. |
| ४ | **फुलपाखरु उद्यान** | जैव विविधतेबाबत जनजागृतीचे विविध प्रकल्प राबविण्याच्या दृष्टीने ठाणे शहरामध्ये स्व.प्रमोद महाजन निसर्ग उद्यान, मुल्लाबाग, येथे १० एकर जागेत फुलपाखरु उद्यान साकारण्यात आले. तेथे फुलपाखरांची माहिती देणारे फलक लावण्यात आले. येऊरच्या संजय गांधी राष्ट्रीय अभयारण्यात आढळणारी जवळपास १६० विविध जातींची फुलपाखरे या उद्यानात भविष्यात पाहायला मिळतील. |
| ५ | **मासुंदा तलाव** | मासुंदा तलाव १५ वर्ष कालावधीसाठी भाडे तत्वावर देण्यात आला आहे. सदर तलावाकरीता नेमण्यात आलेल्या ठेकेदाराने आकर्षक कारंजे उभारणे, लहान मुलांसाठी Children Play Area तयार करणे, CCTV कॅमेरे बसवणे, फुड कोर्ट उभारणे, पाणी शुध्दीकरणाकरीता एरिऐशन यंत्रणा बसविणे, बोटींग व मासेमारी करणे व तलावाची साफसफाई करणे इत्यादी कामे करावयाची आहेत. |
| ६ | **तलावांपासून भाडे** | कचराळी तलाव, मखमली तलाव, कौसा तलाव, खारेगाव तलाव, शिवाजी नगर तलाव ही तलावे ५ वर्ष कालावधीसाठी भाडे तत्वावर देण्यात आला आहे. सदर तलावाकरीता नेमण्यात आलेल्या ठेकेदाराने फुड कोर्ट उभारणे, बोटींग व मासेमारी करणे व तलावाची साफसफाई करणे इत्यादी कामे करावयाची आहेत. |

| | | |
|---|---|---|
| ७ | **प्लास्टिक बेलींग मशीन** | ठाणे शहरामध्ये वाढत्या शहरीकरणामुळे पॅकेजिंग वेस्टचे प्रमाण वाढले आहे. उदा.प्लास्टिकची पातळ पिशवी, शॅम्पूची पाकिटे, गुटखा, वेफर्सची पाकीटे अशा प्रकारचा कचरा वर्गीकरण करुन वाहतुकीसाठी सोपा होण्यासाठी ४ प्लास्टिक बेलिंग मशीन खरेदी करण्यात येणार आहे. सदर मशीन सार्वजनिक स्थळी लावण्यात येणार आहे. सदर प्रकल्पाचा खर्च अंदाजे २५ लाख इतका अपेक्षित आहे. |
| ८ | **वेदर मॉनिटरींग मशीन** | ठाणे शहरात एका बाजूस येऊरचा डोंगर व दुसऱ्या बाजूस खाडी आहे. त्यामुळे शहराच्या विविध भागामध्ये हवामानात फरक आढळतो. तसेच शहरातील विविध भागातील पर्जन्यमानात फरक आढळतो. त्या अन्वये ठाणे महानगरपालिका क्षेत्रात विविध ठिकाणी ६ वेदर मॉनिटरींग स्टेशन उभारण्यात येणार आहेत. सदर स्टेशन ठाणे महानगरपालिकेच्या संकेत स्थळाशी जोडून वेदर मॉनिटरींग स्टेशनवरुन प्रत्यक्ष वेळेची माहिती सर्वांसाठी उपलब्ध होणार आहे. त्यामुळे ठाणे शहरातील हवामानाची तसेच पर्जन्यमानाची माहिती नागरिकांना व ठाणे शहरातील विविध आपत्ती निवारण यंत्रणाना सहज उपलब्ध होईल. ३ वर्ष निगा व देखभालीसह सदर प्रकल्पाचा खर्च २५ लाख इतका अपेक्षित आहे. |
| ९ | **हवा गुणवत्ता दर्शक LED फलक उभारणे** | ठाणे शहरात सद्यस्थितीत ४ ठिकाणी हवा प्रदुषणाचे मोजमाप केले जाते. तीन हात नाका येथे Continous Ambient Air Monitoring Station आहे. ठाणे शहरात नॅम्प प्रकल्पांतर्गत कोपरी, नौपाडा व वर्तकनगर येथे हवा प्रदुषणाचे मोजमाप केले जाते तसेच १ वेदर मॉनेटरींग स्टेशन लावण्यात आलेले आहे. सदर फलका वर हवेतील धुळीकण तापमान, पर्जन्यमान $SO_२$, $NO_२$ यांची माहिती दर्शविली जाईल. हया सर्व ठिकाणांची माहिती शहरांच्या विविध चौकामध्ये दर्शविली जाईल. सदर प्रकल्पाचा खर्च २५ लाख खर्च आहे. |

## २. सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पीय अंदाजामधील खर्चाच्या प्रस्तावित तरतुदी

**(रुपये कोटीत)**

| | |
|---|---|
| अ) भांडवली अथसंकल्पीय अंदाज | रु. १८.९० |
| ब) महसुली अथसंकल्पीय अंदाज | रु. १३.११ |
| **एकूण प्रस्ताविलेले अर्थसंकल्पीय तरतदू (अ + ब)** | **रु. ३२.०१** |

# अग्निशमन सेवा

## प्रस्तावित अर्थसंकल्पीय अंदाजातील तरतुदींची ठळक वैशिष्टये व महत्वाच्या निर्धारित फलश्रृती

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे प्रकरण १७ व कलम ६ मधील ६३ (५) अन्वये ठाणे महानगरपालिकेच्या हद्दीतील नागरिकांच्या जिवीताचे व मालमत्तेचे आगीपासून रक्षण करण्याचे अनिवार्य कर्तव्य ठाणे अग्निशमन दल पार पाडीत असून महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक अधिनियम २००६ ची अंमलबजावणी महापालिका हद्दीत सुरु करण्यात आली आहे .

अलिकडच्या काळात ठाणे शहर व ठाणे महापालिकेच्या हद्दीत उत्तुंग इमारती, शॅापिंग मॉलस्, मल्टिप्लेक्स, चित्रपटगृहे इत्यादीसाठी बांधकामात मोठया प्रमाणत झालेली वाढ लक्षात घेता, आग आणि इतर विविध प्रकारच्या धोक्यांची शक्यता वाढली आहे. अशा धोक्याच्या परिस्थितीला सामारे जाण्यासाठी अग्निशमन दलाला लागणा-या आवश्यक साधनसामुग्रीची मोठया प्रमाणावर वाढ करावी लागणार आहे. त्याचप्रमाणे मान्सुन कालावधीत आपत्कालीन परिस्थिती उद्‌भवल्यास त्यावर मात करण्यासाठी वॉटर रेस्क्यू बोट, रॉकेट लॉंचर तसेच इतर विमोचनाची साधने अग्निशमन दलाकडे उपलब्ध असणे आवश्यक असल्याने अग्निशमन दलाचे आधुनिकीकरण व विकास करणे ही काळाची गरज आहे.

ठाणे महापालिकेच्या अग्निशमन दलाची ६ अग्निशमन केंद्रे व मुख्य नियंत्रण कक्ष आहेत.

आग आणि अन्य धोकादायक तसेच आपत्कालीन परिस्थतीमध्ये जीव व मालमत्ता यांची कमीत कमी हानी व्हावी यादृष्टीने अशा परिस्थितीशी जलद आणि प्रभावीपणे मुकाबला करणे ही ठाणे अग्निशमन दलाच्या कार्याची महत्वाची निर्धारीत फलश्रृती आहे. त्यादृष्टीने हया आर्थिक वर्षात अग्निशमन विभागाच्या खालील क्षेत्रांवर भर देण्यात आला आहे.

**भर देण्यात आलेली क्षेत्रे**

- आधुनिक आग विमोचन वाहने (एरियल लॅडर प्लॅटफॉर्म, इमरजन्सी टेंडर, ८ नग वॉटर ब्राऊझर यासारखे आधुनिक यंत्रज्ञानाची वाहने) आणि साधनसामुग्री खरेदी करणे व कालबाहय यंत्रसामुग्री पुढील काही वर्षामध्ये टप्याटप्याने बदलून अग्निशमन दलाचे बळकटीकरण करणे.
- ठाणे अग्निशमन दलाकडील अधिकारी व कर्मचा-यांना साधनसामुग्री विषयी विविध प्रकारचे प्रशिक्षण देऊन (आंतरराष्ट्रीय / राष्ट्रीय / राज्य / जिल्हा / स्थानिक स्तरावर ) त्यांची कार्यक्षमता व सामर्थ्य वाढविणे.
- कोणत्याही आपत्तकालीन प्रसंगी ठाणे अग्निशमन दल आणि मध्यवर्ती नियंत्रण कक्ष यांच्यांत उत्तम समन्वय साधणे व एकत्रित योजनाबध्द कार्यवाही करणे.
- ३ नग क्विक रिस्पॉन्स व्हेईकल घेणे, ९० मीटर उंच एरीयल लॅडर प्लॅटफॉर्म खरेदी करणे.
- बिट फायर स्टेशन उभारणे

**२. उपरोक्त क्षेत्रांतील साध्यासाठी आगामी वर्षात खालील उपक्रम हाती घेण्याचे प्रस्ताविले आहे.**

| अ.क्र. | भर देण्यांत आलेली क्षेत्र | तरतूदी (कोटीत) |
|---|---|---|
| १. | आधुनिक आग विमोचन वाहने आणि साधनसामुग्री खरेदी करणे आणि कालबाहय यंत्रसामुग्री पुढील काही वर्षामध्ये टप्प्या टप्प्याने बदलून अग्निशमन दलाचे बळकटी करण करणे. | रु.२५.०० |
| २ | ओवळा, माजिवडा, शिळ, देसाई गाव व दिवा या ५ ठिकाणी बिट फायर स्टेशन कार्यान्वित करणे. | रु.७.५० |
| ३ | हिरानंदानी इस्टेट व माजिवडा या ठिकाणी असलेल्या विशेष नगर वसाहतीमध्ये प्रत्येकी अग्निशमन केंद्र बांधण्याची कार्यवाही सुरु असून आवश्यकत्या फायर वाहनांसहीत विकासकांनी उपलब्ध करुन दिल्यानंतर दोन्ही अग्निशमन केंद्रे कार्यान्वित करण्यात येतील. | --- |

**३ . अपेक्षित परिणाम**

- ठाणे अग्निशमन दलाचे बळकटीकरण केल्यामुळे नागरिकांना या सेवा अधिक प्रभावीपणे पुरविता येतील.
- भविष्यात आपत्कालीन परिस्थिती उद्‌भवल्यास योग्य विमोचन साधनसामुग्रीच्या उपलब्धतेमुळे नागरीकांना अत्यंत प्रभावी उपलब्ध होईल.
- नविन अग्निशमन केंद्र, मध्यवर्ती नियंत्रण कक्ष तसेच आपत्कालीन व्यवस्थापन केंद्र पूर्णतः कार्यान्वित झाल्यानंतर आपत्कालीन परिस्थितीच्या कोणत्याही ठिकाणी पोहोचण्याच्या वेळेत सुधारणा होऊन ती वेळ नक्कीच कमी होईल.

**४. सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पातील अंदाजांमधील खर्चाच्या प्रस्तावित तरतुदी**

**(रुपये कोटीत)**

| | |
|---|---|
| अ) भांडवली अथसंकल्पीय अंदाज | रु.३८.५० |
| ब) महसुली अथसंकल्पीय अंदाज | रु.८.२० |
| **एकूण प्रस्ताविलेले अर्थसंकल्पीय तरतदू (अ + ब)** | **रु.४६.७०** |

***

# उद्यान विकसिकरण आणि वृक्षलागवडीसह शहराचे सुशोभिकरण

## प्रस्तावित अर्थसंकल्पीय अंदाजातील तरतुदींची ठळक वैशिष्टये व महत्वाच्या निर्धारित फलश्रृती

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ६३ १ (ब) व ६(१०) अन्वये सार्वजानिक उपवने व उद्यान आणि मनोरंजनासाठी जागा उभारणे व त्या सुस्थितीत ठेवणे हे महानगरपालिकेचे स्वविवेकाधिन कर्तव्य आहे. ठाणे शहर हे मुंबई शहरालगत असल्याने त्यास मुंबई इतकेच महत्व प्राप्त होत असल्याने तिचे सौंदर्यात्मक आकर्षण वाढविण्याची गरज आहे. त्यामुळे ठाणे शहराच्या सौंदर्यातच केवळ भर पडणार नाही तर देश विदेशातील पर्यटक ठाणे शहराकडे आकर्षित होतील अशी अनेक कामे महानगरपालिकेने हाती घेतलेली आहेत.

- **जॉगर्स पार्क :-** कळवा पारसिक नगर येथील रस्त्यालगत जॉगर्स पार्क विकसित करण्याचे प्रस्तावित आहे.

- **ॲडवेन्चर पार्क (Adventure Park) :-** मौजे पारसिक, घोलाई नगर येथे ११,००० चौ.मी. क्षेत्रफळावर हरित क्षेत्र विकसित करणे व थिम पार्कच्या आधारावर ॲडवेन्चर पार्क विकसित करणे नियोजित असून त्या अनुषंगाने कार्यवाही सुरु झालेली आहे.

- **जुने ठाणे नवे ठाणे (Old Thane New Thane Park) :-** मौजे चितळसर मानपाडा, घोडबंदर रोड पार्क IV/२००७ मध्ये १ एकर क्षेत्रफळावर जुने ठाणे नवे ठाणे शहराची प्रतिकृती या संकल्पनेवर थिम पार्क विकसित करण्यात येत आहे. या पार्कचे विकसिकरणाचे काम पुर्ण झालेले आहे.

- **बॉलीवूड पार्क (Bollywood Park) :-** वर्तकनगर प्रभागांतर्गत कै.आप्पासाहेब पवार उद्यानामध्ये १.४८ एकर क्षेत्रफळावर बॉलीवूड पार्क या संकल्पनेवर थिम पार्क विकसित करण्यात येत आहे. या पार्कचे विकसिकरणाचे ८० टक्के काम पुर्ण झालेले आहे.

- **जैवविविधता उद्यान (Biodiversity Park) :-** कासारवडवली, घोडबंदर रोड येथील ठाणे महानगरपालिकेच्या ३.२२ एकर क्षेत्रफळावर विविध प्रकारचे वृक्ष, झुडुपे, वेलीची एकत्रित लागवड करुन जैवविविधता उद्यान तयार करण्यात आले आहे. तसेच या उद्यानामध्ये एतिहासिक वास्तुशिल्प बसविणे नियोजित आहे.

- **ट्रॅफिक पार्क (Traffic Park) :-** कावेसर येथे ८ एकर सुविधा भूखंडावर अमृत योजना, महापालिका निधी व प्रायोजकांमार्फत सदर थिम पार्कचे काम करण्यात येत असून यामध्ये तयार करण्यात आलेल्या अर्बन जंगल मध्ये नैसर्गिक पायवाटा तयार करण्यात आलेल्या आहेत.

- **एन्जल्स पॅराडाईज पार्क :-** कोपरी, बारा बंगला येथे २ एकर क्षेत्रफळावर एन्जल्स पॅराडाईज पार्क विकसित करण्याचे काम सुरु आहे.

- **श्रीनिवास खळे उद्यान :-** उपवन तलाव येथे ३००० चौ.मी. क्षेत्रफळावर श्रीनिवास खळे उद्यान विकसित करण्यात आले आहेत.

- **फुलपाखरु उद्यान (Butterfly Park) :-** स्व.प्रमोदजी महाजन निसर्ग उद्यान, मुल्लाबाग येथे १.५ एकर क्षेत्रफळावर फुलपाखरु उद्यान विकसित करण्याचे काम नियोजित आराखडयानुसार सुरु आहे.

- **उद्यानामध्ये सूचना फलक व कमान बसविणे :-** ठाणे महानगरपालिकेच्या एकूण १३८ उद्यानांमध्ये उद्यानाच्या नावाची कमान व उद्यानातील नियमाकरीता सुचनाफलक बसवण्याचे काम सुरु आहे.
- **ग्रीन वॉल तयार करणे :-** ठाणे शहरातील हरित क्षेत्र वाढवण्याच्या हेतुने उड्डाण पुलाच्या पिलरना ग्रीन वॉल तयार करणे नियोजित असून माजिवडा येथे काम सुरु आहे.
- **रस्ता दुभजकांचे सुशोभिकरण करणे :-** ठाणे शहरातील उथळसर, माजिवडा-मानपाडा, वर्तकनगर, वागळे इस्टेट प्रभाग समिती अंतर्गत अंदाजे ५.९ कि.मी. मॉडेल रोड, ७.३ कि.मी. नव्याने ठेका पध्दतीने दुभाजक विकसित करणे, १२ कि.मी. प्रायोजक तत्वावर दुभाजक विकसित करण्याचे काम सुरु आहे.

- **उड्डाणपुल सुशोभिकरण करणे :-** शहरातील उड्डाणपुलाच्या भिंतीवर वेली चढवून हरितक्षेत्र विकसित करण्याचे काम नियोजित आहे.

- **लहान मुलांसाठी खेळणी बसविणे :-** ठाणे महानगरपालिकेच्या ५० उद्यानामध्ये लहान मुलांसाठी खेळणी बसविण्याचे काम सुरु असून २५ उद्यानांमध्ये खेळणी बसविण्यात आली आहेत.

- **उत्कृष्ट बाग सुशोभिकरण, निगा - देखभाल स्पर्धा :-** ठाणे शहरातील घराच्या परिसरात परसबाग / छतावरील बाग तयार करणाऱ्यांसाठी उद्यान विभाग, वृक्षप्राधिकरण तसेच समाज विकास यांच्या संयुक्त विद्यमाने उत्कृष्ट बाग सुशोभिकरण निगा व देखभाल स्पर्धा आयोजित केली असून नागरिक, कंपनी, गृहसंकुल व इतर असे एकूण ३५० स्पर्धकांनी सहभाग घेतला.

- **५ लक्ष वृक्षलागवड योजना :-** ठाणे महानगरपालिकेमार्फत नागरी विकास कामे, लोकसहभागातून प्रायोजक, सेवाभावी संस्थांचा सहभाग घेऊन पुढील २ वर्षात ५ लक्ष

वृक्षलागवड करण्याची योजना राबविण्यात आली आहे. सदर योजने अंतर्गत प्रथम टप्प्यात पहिल्या वर्षी म्हणजेच सन २०१५-१६ मध्ये ठाणे महापालिकेमार्फत ५० हजार वृक्ष लागवड पुर्ण करण्यात असून दुसऱ्या टप्प्यात सन २०१६-१७ मध्ये १.६१ लक्ष वृक्षलागवडीचे उद्दीष्ट साध्य झाले आहे. या योजनेच्या तिसऱ्या टप्प्यात सन २०१७-१८ मध्ये २.८७ वृक्षलागवडीचे उद्दीष्ट साध्य झाले आहे. या वृक्षलागवडीच्या योजनेमध्ये ठाणे महानगरपालिका व सेवाभावी संस्था, पर्यावरण विषयक काम करणाऱ्या व्यक्ती, खाजगी संस्था, विकासक, शाळा, महाविद्यालये यांच्याकडून लोक सहभागातून एकूण ५वर्षामध्ये ५ लक्ष वृक्षलागवड योजनेचे उद्दीष्ट साध्य झाले आहे.

- **अर्बन जंगल तयार करणे :-**
  - मौजे कोलशेत सेक्टर ५, आरक्षण क्र.५ येथे शासनाच्या अमृत योजनेतंर्गत हरित क्षेत्र विकसित करण्याच्या अनुषंगाने अर्बन जंगल विकसित करण्याचे काम सुरु आहे. सदर ठिकाणी १०,००० वृक्षलागवडीचे उद्दीष्ट साध्य करण्यात आले आहे.
  - माजिवडा-मानपाडा प्रभागातंर्गत तुर्फे पाडा येथील तलावाच्या परिसरात २.८६ हेक्टर क्षेत्रफळावर हरित क्षेत्र विकसित करण्याच्या अनुषंगाने अर्बन जंगल विकसित करण्यात आले आहे. सदर ठिकाणी ३,६०० वृक्षलागवडीचे उद्दीष्ट साध्य करण्यात आले आहे.
  - माजिवडा-मानपाडा प्रभागातंर्गत वाघबीळ येथील पार्क आरक्षण क्र.२ येथील १.५० हेक्टर क्षेत्रफळावर हरित क्षेत्र विकसित करण्याच्या अनुषंगाने अर्बन जंगल विकसित करण्यात आले आहे. सदर ठिकाणी ३,४०० वृक्षलागवडीचे उद्दीष्ट साध्य करण्यात आले आहे.

- **वृक्षांच्या भोवतालचे सिमेंट, डांबर, पेवर ब्लॉक काढणे :-** ठाणे महानगरपालिका हद्दीतील वृक्षांच्या मुळाशी हवा खेळती राहण्याकरिता वृक्षांच्या भोवतालचे सिमेंट, डांबर, पेवर ब्लॉक काढण्यात येणार आहेत.

- **वृक्षांना गेरु-चुना लावणे :-** ठाणे शहरातील रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या अस्तित्वातील वृक्षांच्या बुंध्यापासून ५ फूट उंच खोडाला सुशाभिकरणाच्या हेतूने अंदाजे १०,००० वृक्षांना गेरु व चुना लावण्याचे काम सुरु आहे.

- **वृक्षगणना :-** ठाणे शहरातील अस्तित्वातील अंदाजे ५.६४ वृक्षांची GIS/GPS व्दारे वृक्षगणना करण्याचे काम सुरु असून १.६३ लक्ष वृक्षांची गणना पूर्ण झालेली आहे यामध्ये वृक्षांची प्रजात, उंची, घेर, वय, रेखांश व अक्षांश इत्यादी माहिती घेतली जाते.

- **वृक्षवल्ली :-** सन २०१७-१८ या वर्षात झाडे, फळे, फुले व भाजीपाला यांचे १० वे भव्य प्रदर्शन १२ जानेवारी ते १४ जानेवारी २०१८ दरम्यान रेमंण्ड कंपनी मैदान, पोखरण रोड नं.१, ठाणे आयोजित करण्यात आले. यामध्ये ३०० हून अधिक प्रकारच्या झाडांचा व फुलांचा समावेश करण्यात आला असून अंदाजे ५०,००० नागरिकांचा सहभाग व २५० ते ३०० स्पर्धकांनी सहभाग घेतला होता.

- **स्वच्छ भारत सर्वेक्षण अभियान :-** सन २०१७-१८ मध्ये राबविण्यात आलेल्या स्वच्छ भारत सर्वेक्षण अभियानांतर्गत उद्यान विभागातील सर्व बागांमध्ये हरित कचरा व्यवस्थापनाचा भाग म्हणून कंपोस्ट खड्डे तयार करण्यात आले आहेत. त्यामध्ये निर्माण होणारे कंम्पोस्ट उद्यानातील झाडांना व जवळच्या नागरिकांना मोफत दिले जाते.

**३. अपेक्षित परिणाम :**

- विविध उद्याने, चौक, रस्ते दुभाजक, हरित पट्टे, आयलॅण्डस, हिरवळ व शोभिवंत झाडांच्या लागवडीसह विकसिकरण व निगराणी राखल्याने ठाणे शहराच्या सौंदर्यीकरणात वाढ होईल.
- अद्ययावत थीम पार्क विकसिकरणामुळे ठाणे शहराच्या हरित क्षेत्रामध्ये वाढ होऊनशहराच्या प्रदूषण नियंत्रणासाठी उपयोग होईल. तसेच नागरिकांना अधिक प्रमाणात मनोरंजनाच्या सोयी सुविधा उपलब्ध होतील.
- हरित क्षेत्रामध्ये वाढ झाल्याने हवा शुध्द होण्यास तसेच ध्वनीप्रदूषण कमी होण्यास मदत होईल व हवेतील कार्बनडाय ऑक्साईड चे प्रमाण कमी होण्यास मदत होईल.
- ४.डोंगराळ भागात वृक्षारोपण केल्याने जमिनीची धूप कमी होऊन जमिनीचा पोत वाढण्यास मदत होईल.

**४. सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकामधील खर्चाच्या प्रस्तावित तरतुदी**

**(रुपये कोटीत)**

| | |
|---|---|
| अ) भांडवली अथसंकल्पीय अंदाज | रु. ४७.१० कोटी |
| ब) महसुली अथसंकल्पीय अंदाज | रु. २८.१५ कोटी |
| **एकूण प्रस्ताविलेले अर्थसंकल्पीय तरतदू (अ + ब)** | **रु.७५.२५ कोटी** |

# विद्युत विभाग

## प्रस्तावित अर्थसंकल्पीय अंदाजातील तरतुदींची ठळक वैशिष्टये व महत्वाच्या निर्धारित फलश्रृती

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २४९ नुसार महापालिकेतर्फे रस्त्यावरील दिवाबत्तीची सोय करण्यात येते. महापालिकेच्या इमारतींसाठी प्रकाश व्यवस्था, रस्त्यावरील दिवाबत्ती व अनुषंगिक बाबींची व्यवस्था करण्यात येते.

### १. रत्यावरील दिवाबत्ती

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २४९ नुसार महापालिकेतर्फे रस्त्यावर दिवाबत्तीची सोय करण्यात येते. तसेच महापालिकेच्या इमारतीसाठी प्रकाश व्यवस्था व अनुषंगिक बाबींची व्यवस्था करणेत येते.

**भर देण्यात आलेली क्षेत्रे**

- महापालिकेच्या विद्युत संच मांडणीमध्ये ऊर्जा कार्यक्षमता व अपारंपारिक ऊर्जेचा वापर.
- वाहतुकीच्या व पादचा-यांच्या सोईसाठी आधुनिक पध्दतीने ऊर्जा कार्यक्षम पथदिप लावणे.
- सार्वजनिक वाहतुकीच्या दृष्टीने वाहतूक नियंत्रणक बसविणे.
- महानगरपालिकेच्या उद्यानांमध्ये आकर्षक प्रकाश व्यवस्थेची सोय करणे.
- नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने विविध ठिकाणी सी.सी.टि.व्ही. कॅमेरे बसविणे तसेच " डिजिटल इंडिया " संकल्पने अंतर्गत नागरिकांना मोफत वाय फाय सेवा पुरविणे.

**२. उपरोक्त क्षेत्रातील साध्यासाठी आगामी वर्षात खालील उपक्रम हाती घेण्याचे प्रस्ताविले आहे.**

| भर देण्यात आलेली क्षेत्रे | उपक्रम | तरतुदी (कोटीत) |
|---|---|---|
| रस्त्यावरील दिवाबत्ती | वाहतूक व पादचा-यांच्या सोईसाठी रस्त्यावर आधुनिक पध्दतीचे ऊर्जा कार्यक्षम पथदिप लावणे. | रु.२०.०० |
| | MSEDCL चे विद्युत संयंत्र स्थलांतरीत करणे | रु.२०.०० |
| | मागासवर्गीय निधी अंतर्गत रस्त्यावरील दिवाबत्ती | रु.४.०० |
| | पादचारी पुलांवर विद्युतीकरण | रु.२.०० |
| | स्मशानभूमीचे विद्युतीकरण | रु.३.०० |
| वाहतूक नियंत्रक | | रु.१.०० |
| सौर ऊर्जेवर आधारित विज निर्मिती यंत्रणा. | महापालिकेच्या इमारतींवर सौर ऊर्जेवर आधारित विज निर्मिती यंत्रणा बसविणे. | रु.२.०० |
| पथदिप इमारतींमधील विद्युत उपकरणे, पाण्याचे पंप | महानगरपालिकेच्या पथदिपाकरिता ऊर्जा कार्यक्षम LED चा वापर तसेच इमारती मधील विद्युत उपकरणे, ५ स्टार रेटेड ऊर्जा कार्यक्षम सिलिंग पंखे, ऊर्जा कार्यक्षम T-५ टयुब लाईट लावणे, पाण्याचे पंप अधिक ऊर्जा कार्यक्षम साहित्य वापर. | रु.४.०० |
| भविष्यकालिन योजना | स्मार्ट सिटी सर्व्हिलन्स प्रकल्प | रु.८.५० |
| | डिजिटल मेसेजिंग सिस्टीम | रु.३.०० |
| | नेट झिरो संकल्पना राबविणे | रु.३.०० |
| | स्मार्ट सिटी सेन्सर | रु.३.०० |
| | सोलार एनर्जी केंद्र | रु.०.५० |
| | व्हेईकल चार्जिंग स्टेशन | रु.२.०० |
| | वीज निर्मिती व वीज वितरण यंत्रणा उभारणे (Licensee) | रु.२.०० |
| | वातनुकुलित यंत्रणेसाठी जिओ थर्मलचा वापर | रु.२.०० |
| | उपवन तलावावर हायड्रोपोनिक्स प्रकल्प | रु.२.०० |

**३. अपेक्षित परिणाम**

- ➢ रात्रीच्या वेळेस नागरिक व वाहतूक सुरक्षिततेच्या, सुविधेच्या दृष्टीने फायदा.
- ➢ शहरातील कायदा, सुव्यवस्था व चो-यांचे प्रमाण कमी होण्याच्या दृष्टीने उपयुक्त.

- शहर सुशोभिकरणामध्ये सहभाग, विज वापरात बचत, पर्यावरणाभिमुख.
- अपारंपारिक ऊर्जा स्त्रोतांचा वापर परिणमतः पारंपारिक ऊर्जा म्हणजेच विजेची बचत.
- ऊर्जा कार्यक्षम साहित्य वापर पर्यायाने विजेची बचत.

**४. सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पीय अंदाजातील खर्चाच्या प्रस्तावित तरतुदी**

**(रुपये कोटीत)**

| | |
|---|---|
| अ) भांडवली अथसंकल्पीय अंदाज | रु. ८२.०० |
| ब) महसुली अथसंकल्पीय अंदाज | रु. १७.३७ |
| **एकूण प्रस्ताविलेले अर्थसंकल्पीय तरतदू (अ + ब)** | **रु. ९९.३७** |

# शिक्षण विभाग

## प्राथमिक शिक्षण

### प्रस्तावित अर्थसंकल्पीय अंदाजातील तरतुदींची ठळक वैशिष्टये व महत्वाच्या निर्धारित फलश्रृती

ठाणे महानगरपालिका शिक्षण विभागातंर्गत पूर्व प्राथमिक (बालवाडी) ५५, सर्व माध्यमाच्या प्राथमिक शाळा १३१, माध्यमिक १३ आणि जिद्द शाळा १ अशा एकूण १९६ शाळा असून त्यामध्ये सुमारे ३७००० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्यानुसार महत्वाची फलश्रुती खालीलप्रमाणे आहे.

**१.** बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ कायद्यान्वये ६ ते १४ वयोगटातील बालकांच्या शिक्षणासाठी मोफत व सक्तीचा कायदा अमलात आणलेला असून या कायद्यानुसार महानगरपालिका क्षेत्रातील मनपाच्या प्राथमिक शाळांच्या व विद्यार्थ्यांच्या दर्जात्मक आणि गुणात्मक बाबींसाठी उपाययोजना करणे हे महापालिकेचे अनिवार्य कर्तव्य आहे. त्यानुसार सन २०१८-१९ च्या नाविन्यपूर्ण योजनांची फलश्रुती पुढीलप्रमाणे आहे.

**प्राथमिक विभाग**

(१) **ज्ञानरचनावाद :-** या उपक्रमांतर्गत मुलींच्या गळतीचे प्रमाण कमी करणे, राज्याला राष्ट्रीय पातळीवर शैक्षणिक गुणवत्तेत प्रथम आणण्याचे उद्दिष्ट साध्य करणे, ज्ञानरचनावाद अभ्यासक्रम राबवून त्या अनुषंगाने विद्यार्थी गळतीचे प्रमाण थांबविणे, सदर अभ्यासक्रमानुसार भौतिकदृष्टया शाळा इमारत, वर्ग अद्ययावत करणे. यामध्ये

विशेष बाब म्हणजे उर्दू माध्यमाच्या २३ शाळांतील सुमारे ८५०० विद्यार्थ्यांना ज्ञानरचनावादाव्दारे शिक्षण देणारी राज्यातील ठाणे महानगरपालिका ही पहिली महानगरपालिका असेल. ज्ञानरचनावादाचे पहिल्या टप्यात १२५ शिक्षकांना व दुसऱ्या टप्यात १२५ शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात आले. ज्ञानरचनावादाचे प्रणेते श्री. रमेश पानसे यांच्या मार्फत २० शिक्षकांना रचनावादाचे प्रशिक्षण देण्यात आले.

(२) **१० सेमी इंग्रजी स्मार्ट स्कूल निर्मिती :-** मागील शैक्षणिक वर्षात ३ सेमीइंग्रजी स्कूल सुरु केल्याने याबाबतचा वाढता प्रतिसाद पहाता शाळांची पटसंख्या वाढविणे, जागतिकीकरणाच्या स्पर्धेत टिकून राहणेसाठी दर्जेदार इंग्रजी शिक्षण देवून शिक्षण विभागाबद्दलच्या समाज दृष्टीकोन सकारात्मक करणेसाठी इयत्ता पहिलीपासून एकूण १० (५ऊर्दु व ५ मराठी) शाळांमध्ये स्मार्ट सेमी इंग्रजी वर्ग सुरु करण्यात आले.

(३) **२ इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरू करण्यात आल्या :-** इंग्रजी माध्यमातून शिक्षण याबाबतचा वाढता कल पाहता ठामपाच्या इंग्रजी माध्यमाचा शाळांचा पट वाढत असून सध्याच्या सुरु असलेल्या इंग्रजी माध्यमाच्या शाळा अपु-या पडत आहेत. त्यामुळे हया इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरु करण्याबाबतच्या मागणीचा विचार करता २ इंग्रजी माध्यमाच्या शाळा विटावा (शाळा क्र. ७२) व कौसा (शाळा क्र. १००) येथे सुरु करुन तेथे भौतिक सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या. इंग्रजी माध्यमातील दर्जेदार शिक्षण मिळावे या हेतुने इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरु केल्या आहेत.

(४) **वासंतिक वर्गांचे आयोजनः-** बालवाडी व प्राथमिक शाळांचा पट वाढविण्यासाठी "प्रथम" यासंस्थेच्या सहकार्याने माहे एप्रिल व मे या दोन महिन्यात वासंतिक वर्गाचे आयोजन करण्यात आले. या वासंतिक वर्गातून ९०० विद्यार्थी इयत्ता पहिलीत सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात दाखल झाले. तसेच बालवाडी ३०० विद्यार्थी दाखल झाले.

(५) **P.P.P. चे माध्यमातून दिव्यांग (अंध) विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक तथा बहुउद्देशीय संसाधन केंद्राची निर्मिती :-** रोटरी क्लब ऑफ लेक सिटी , ठाणे या संस्थेमार्फत शा.क्र.९, ठाणे (पूर्व) येथे दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी रिसोर्स सेंटरची निर्मिती करुन या दिव्यांग विद्यार्थ्यांना (अंध) ऑडीओ बुकस् , ब्रेललिपीचे किट व यासंबंधीचे software च्या माध्यमातून उच्च शिक्षणासाठी तयारी तसेच UPSC , MPSC सारख्या स्पर्धात्मक परिक्षेची तयारी करणेसाठी ऑडीओ लायब्ररी NAB या संस्थेच्या मदतीने व्यावसायिक प्रशिक्षण केंद्र इत्यादी सोयी सुविधा पुरविण्यात आल्या असून महानगरपालिकेने जागा उपलब्धतेबरोबर इतर सोयी सुविधा पुरविल्या आहे. यामध्ये ठाणे महापालिका हद्दीतील आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना ५०% प्रवेश व ५०% विद्यार्थ्यांना सदर संस्था अल्पदराने फी आकारुन संस्थेचा खर्च भागविणार आहे.

(६) **अपघात विमा योजना** :- ठाणे महानगरपालिका शाळेतील बालवाडी ते १० वी पर्यंतच्या एकूण ३००५६ विद्यार्थ्यांचा विमा उतरविण्यात आला असून त्याचा लाभ सर्व विद्यार्थ्यांना होणार आहे.

(७) **CSR योजनेअंतर्गत ग्रंथालय निर्मिती :**- रूम टू रिड या संस्थेमार्फत २५ प्राथमिक शाळांमध्ये ग्रंथालय सुरू करण्यात आले. सदर संस्थेने या शाळांना रंगरंगोटी केली, तसेच पुस्तके देण्यात आली व टेबल व खुर्च्या देखील दिल्या.

(८) **टेक महिंद्रा संस्थेमार्फत CSR योजनेतंर्गत स्पोकन इंग्लिश कार्यशाळा** :- ठाणे महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळेच्या ४० शिक्षकांना ६ दिवसीय निवासी कार्यशाळेचे आयोजन उत्तन येथे करण्यात आले. तसेच या शिक्षकांना ३-३ दिवसांचे प्रशिक्षण देखील देण्यात आले.

(९) **नवनिर्मिती टेक महिंद्रा मार्फत CSR माध्यमातून गणित प्रशिक्षण तसेच गणित जत्रेचे आयोजन** :- नवनर्मिती मार्फत प्राथमिक शाळेच्या ४० शिक्षकांना गणित प्रशिक्षण देण्यात आले. सदर प्रशिक्षणामध्ये वेगवेगळया पध्दतीने विद्यार्थ्यांना गणित कसे शिकवावे याबाबत प्रशिक्षण देण्यात आले. तसेच नवनिर्मितीमार्फत १५ शाळांना अद्ययावत गणिती पेटया विनामूल्य देण्यात आल्या.

**२. सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पीय अंदाजातील खर्चाच्या प्रस्तावित तरतुदी**

**(रुपये कोटीत)**

| | |
|---|---|
| अ) भांडवली अथसंकल्पीय अंदाज | रु. १०.८५ |
| ब) महसुली अथसंकल्पीय अंदाज | रु. ६७.०० |
| **एकूण प्रस्ताविलेले अर्थसंकल्पीय तरतदू (अ + ब)** | **रु.७७.८५** |

# कर निर्धारण व संकलन

## प्रस्तावित अर्थसंकल्पीय अंदाजातील तरतुदींची ठळक वैशिष्टये व महत्वाच्या निर्धारित फलश्रृती

मालमत्ता कर हे ठाणे महानगरपालिकेच्या उत्पन्नाचे एक प्रमुख स्त्रोत आहे. कर निर्धारण व संकलन खात्यामार्फत ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्तांवरील मालमत्ता कराचे संकलन केले जाते. हया स्त्रोतापासुन मिळणा-या उत्पन्नामध्ये वाढ करण्यासाठी शक्य ते सर्व प्रयत्न करीत असताना या व्यवहारातील पारदर्शकता आणि जनतेच्या सोयी याकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही.

१. महानगरपालिकेची मालमत्ता कराचे निर्धारण आणि संकलनाची प्रक्रिया सुसंगत आणि पारदर्शक करणे. जेणेकरुन करदात्यांना कर भरणा करण्यासाठी प्रोत्साहित केले जाईल आणि कर चुकवेगिरीलाही आळा बसेल ही या क्षेत्रातील महत्वाची निर्धारित फलश्रुती आहे. यासाठी खालील क्षेत्रांवर भर देण्यात आलेला आहे.

**भर देण्यात आलेली क्षेत्रे**

- नियमित व वेळेवर कर भरण्यासाठी करदात्यांना उत्तेजन देणे.
- वादग्रस्त प्रकरणांमध्ये अडकलेली रक्कम मिळविण्यासाठी अशी प्रकरणे लवकर निकाली काढणे.
- कर निर्धारण व संकलन प्रक्रिया संयुक्तिक व पारदर्शक करणे. या अंतर्गत मालमत्ता धारकांना आपला कर ऑनलाईन भरण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. तसेच मालमत्ता कर भरण्यासाठी व पुढील कटु कारवाई टाळण्यासाठी Digital Campaign अंतर्गत Google Campaign /Facebook Campaign /What's app Video तसेच चौकामध्ये व भिंतीवर Wooden Frame Flex तसेच Poster Campaigning करणे.

## कार्यानुरुपता

## दर्शके

| | आऊटपूट इंडिकेटर्स | | आऊटकम इंडिकेटर्स |
|---|---|---|---|
| १ | इच्छुक करदाता नोंदणी झालेल्या मालमत्ता - १७१६६६ | - | कर निर्धारण कालावधी आणि खर्चात कपात -\ दिवसात कार्यवाही व संगणकीकरणामुळे आस्थापन खर्चात कपात. |
| २ | वादविवाह निकाल दर - ९०% | - | स्वयंमूल्यांकन दर - JNNURM अंतर्गत भांडवल मूल्यांवर आधारित कार्यपध्दती अंतर्गत स्वयंमूल निर्धारण कर आकारणी पध्दत अवलंबण्यात आली आहे तथापि, मालमत्ता धारकांकडून यास नकारात्मक प्रतिसा मिळाला. |
| ३ | संगणकीकरणाचा दर कामाच्या ९०% | - | विलंब बाबींमध्ये घट - ९० टक्क्यापर्यत |
| | **ऑपरेशनल इंडिकेटर्स** | - | **फायनल स्टेज आऊटकम** |
| ४ | वाढता महसूल- १०% ते १५% | - | महसुल संकलनाचे खर्चाशी प्रमाण -४% |
| ५ | वादातीत प्रकरणांचा कालावधी - ६ महिने | - | सुधारित पूर्णत्व दर - ९५% |
| ६ | ऑपरेशनल आऊटकम मॉनिटरींग ॲण्ड इव्हॅल्युएशन सिस्टीमची उभारणी (होय / नाही) | - | महसुलाचा वाढत जाणारा दर - १०% ते १५% |
| | | - | आंतराष्ट्रीय मानकांप्रमाणे कर निर्धारण व लोकसंख् व्याप्ती संकलनाचा पूर्णत्वाचा दर, वाद, निकाल महसुलाचे खर्चाशी प्रमाण, महसुलाचा वाढत वार्षिक दर, सार्वजनिक व्ययामधील क्षमतावृध्दी प्रस्तावित |

**२. उपरोक्त क्षेत्रांतील साध्यासाठी आगामी वर्षात खालील उपक्रम हाती घेण्याचे प्रस्ताविले आहे.**

<table>
<tr><th>भर देण्यात आलेली क्षेत्र</th><th colspan="2">उपक्रम</th><th>तरतुदी (कोटीत)</th></tr>
<tr><td>• नियमित व वेळेवर कर भरण्यासाठी करदात्यांना उत्तेजन देणे</td><td>एक)</td><td>सन २००९ महाराष्ट्र अधिनियम ७ अन्वये MMC ACT मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी कलम १४० ब अन्वये परिस्थितीकीय दृष्ट्या लाभदायक योजना गृहनिर्माण यांना चालना देणारी अथवा महापालिकेने किंवा शासनाने निश्चित केलेली या सारख्या योजना अंतर्गत १) महापालिका ठराव क्र.२११ दि.३१/०३/२००५ अन्वये अस्तित्वातील सन २००० पूर्वीच्या इमारतीवर सौरऊर्जा कार्यप्रणाली कार्यान्वीत केल्यास अशा इमारतींना मालमत्ता करात शासनाचे कर वगळून १०% सूट देण्यांत येते. २) महापालिका ठराव क्र.१५४दि.३१/०७/२००७ अन्वये अस्तित्वातील सन २००० पूर्वीच्या इमारतीमध्ये रेन वॉटर हार्वेस्टिंग कार्यप्रणाली कार्यान्वीत केल्यास अशा इमारतींना मालमत्ता करात शासनाचे कर वगळून ५ % सूट देण्यात येते. ३) माजी सैनिक व त्यांची पत्नी हयात असेपर्यत त्यांना मालमत्ता कराच्या सामान्य करात १००% सवलत देण्यात येईल. ४) करदाता कल्याण योजनेतंर्गत जे मालमत्ताधारक माजी सैनिक अथवा माजी सैनिक बोर्डाचे सदस्य आहेत त्यांना त्यांच्या पत्नीला मालमत्ता कराच्या सामान्य करात १००% सवलत देण्यात आहे.</td><td>रु.३.५०</td></tr>
<tr><td></td><td>दोन)</td><td>"अर्ली बर्ड" इन्सेटीव्ह स्कीम या योजनेतंर्गत पहिल्या सहामाहीबरोबर दुस-या सहामाहीचा मालमत्ता कर विहित मुदतीत आगाऊ भरल्यास, दुस-या सहामाहीच्या रक्कमेवर ५ ते २ टक्के इतकी सवलत देण्यात येते.<br>
<table>
<tr><th>कालावधी</th><th>सूट चा दर</th></tr>
<tr><td>३१ मे पर्यत पूर्ण रक्कम भरल्यास</td><td>१०%</td></tr>
<tr><td>१ जून ते ३० जून</td><td>४%</td></tr>
<tr><td>१ जुलै ते ३१ जुलै</td><td>३%</td></tr>
<tr><td>१ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट</td><td>२%</td></tr>
</table>
सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरीता ज्या मालमत्ताधारकांनी आगाऊ मालमत्ता कर भरला आहे</td><td></td></tr>
</table>

| भर देण्यात आलेली क्षेत्र | उपक्रम | | तरतुदी (कोटीत) |
|---|---|---|---|
| | | त्यांना रु.७.१० कोटी सवलत देण्यात आली आहे. उपरोक्त रिबेटच्या कालावधीमध्ये मागिल वर्षाच्या तुलनेत रु.१०० कोटी इतका वाढीव मालमत्ता कराचा महसूल जमा झालेला आहे. | |
| ● वादग्रस्त प्रकरणांमध्ये अडकलेली रक्कम मिळविण्यासाठी अशी प्रकरण लवकर निकालात काढणे ● | एक) | मालमत्ता निर्धारणाची वादग्रस्त प्रकरणे सेटलमेंट ॲडव्हायझरी बोर्डामार्फत न्यायालयीन बाहय समझोत्याव्दारे लवकर निकालात काढणे. अश्या ॲडव्हाझरी बोर्डची स्थापना करण्यासाठी सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ अन्वये महाराष्ट्र नगर पालिका मालमत्ता कर मंडळ स्थापन करण्याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमात १९४९ मध्ये तरतूद करण्यात आली आहे. | |
| | दोन) | ग्रामीण व शहरी भागामध्ये मालमत्ता कराच्या संदर्भातील अपिल प्रकरणांची सुनावणी करुन ती निकालात काढण्यासाठी अतिरिक्त लघुवाद न्यायालयाची स्थापना, ॲडव्हाझरी बोर्डाची स्थापना करण्यासाठी सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ अन्वये महाराष्ट्र नगरपालिका मालमत्ता कर मंडळ स्थापन करण्याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामध्ये तरतूद करण्यात आली आहे. | |
| ● कर निर्धारण व संकलनाची प्रक्रिया तर्कसंगत आणि पारदर्शक करणे. | एक) | मालमत्ता कर (Property Tax) फेर तपासणी अंतर्गत नवीन मालमत्ता, वापरात बदल, वाढीव क्षेत्रफळ असलेल्या मालमत्तांचा शोध. | |
| | दोन) | कर निर्धारण व संकलन खात्याच्या संगणकीकरणाकरिता व क्युबिकल सिस्टीमप्रमाणे बैठक व्यवस्था करण्याकरिता विविध उपकरणे पुरविणे | |
| | तीन) | मिळकतींची फेरतपासणी व संगणकीकरणाअंतर्गत सर्व मालमत्ता कर आकारणीच्या अंमलाखाली आणून, संपूर्ण संगणकीकरण करुन कामात गती, तत्परता सुसूत्रता आणून करवसुलीच्या आर्थिक महसुलात वाढ होईल. | |
| | चार) | कर निर्धारण व संकलन खात्याकरिता केंद्रीय अभिलेख कार्यालय म्हणून मुख्यालय येथे प्रॉपर्टी टॅक्स | |

| भर देण्यात आलेली क्षेत्र | उपक्रम | | तरतुदी (कोटीत) |
|---|---|---|---|
| | | कक्ष स्थापन करणे. केंदीय अभिलेख कार्यालय स्थापन करण्याकरिता मुख्यालयात जागा उपलब्ध झाल्यास, असा कक्ष स्थापन करता येईल. | |
| मॉनिटरींग तसेच इव्हॅल्युएशन सेल | करवसुली विभागाच्या कर्मचारी वृंदासाठी दरवर्षी मुख्य आस्थापना विभागाकडून प्रशिक्षण / कार्यशाळा आयोजित करण्यांत येते. त्यामुळे कामामध्ये तत्परता, सुसुत्रता, गती येत आहे. सदरचा खर्च मुख्य आस्थापना विभागाकडून करण्यात येतो | | |

## ३. अपेक्षित परिणाम

- नियमित व वेळेवर कर भरण्यासाठी करदात्यांना प्रोत्साहन दिल्यामुळे तसेच मालमत्ता धारकांना आपला मालमत्ता कर वेळेत भरण्यासाठी सूचित करणे व पुढील कटु कारवाई टाळण्यासाठी Digital Campaign अंतर्गत Google Campaign /Facebook Campaign /Whatup Video तसेच चौकामध्ये व भिंतीवर Wooden Frame Flex तसेच Poster Campaigning करणे. महाराष्ट्र शासनाने स्थापन केलेल्या महाराष्ट्र नगरपालिका मालमत्ता कर मंडळामार्फत न्यायालयीन प्रकरणांची त्वरीत सुनावणी करुन ती लवकर निकालात काढण्यांत येतील व त्यामुळे मालमत्ता कराची थकबाकी कमी होऊन कर महसुलात वाढ होईल.

## ४. सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पीय अंदाजातील खर्चाच्या प्रस्तावित तरतुदी

**(रुपये कोटीत )**

| | |
|---|---|
| अ) महसुली अर्थसंकल्पीय अंदाज | रु.५.०५ |
| **एकुण प्रस्ताविलेली अर्थसंकल्पीय तरतुद (अ )** | **रु. ५.०५** |

# आपत्कालीन व्यवस्थापन व मध्यवर्ती नियंत्रण कक्ष

## प्रस्तावित अर्थसंकल्पीय अंदाजातील तरतुदींची ठळक वैशिष्टये व महत्वाच्या निर्धारित फलश्रृती

**१.** ठाणे महानगरपालिका कार्यक्षेत्रात उदभवणा-या नैसर्गिक आणि मानव निर्मित आपत्तीचे निवारण व व्यवस्थापनाकरीता महानगरपालिकेने आपत्तीच्या काळात सार्वजनिक सुरक्षिततेबाबत कार्यक्षम यंत्रणा प्रस्थापित करणे, जनजागृती करणे, जिवित व मालमत्ता यांना पोहोचणा-या धोका किंवा हानीचे प्रमाण कमी करण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करणे आवश्यक आहे.

नैसर्गिक आणि मानवनिर्मित आपत्तीच्या वेळी जिवित व मालमत्ता यांची कमीत कमी हानी व्हावी या दृष्टीकोनातून जलद आणि प्रभावी प्रतिसाद देणे ही आपत्ती व्यवस्थापन क्षेत्रामधील महत्वाची निर्धारीत फलश्रृती आहे. त्यासाठी महानगरपालिकेने सुसज्ज प्रादेशिक आपत्ती व्यवस्थापन कक्ष स्थापन केलेले असून खालील क्षेत्रावर विशेष भर दिला आहे.

**भर देण्यात आलेली क्षेत्रे**

- नैसर्गिक आपत्तीच्या काळात जेथे जेथे शक्य आहे तेथे सर्व संबंधितांना पुर्व सूचना देणे
- अत्याधुनिक स्वयंपुर्ण व निर्दोष संपर्क यंत्रणा विकसित करणे
- नैसर्गिक किंवा मानव निर्मित आपत्तीमध्ये जलद व प्रभावी प्रतिसाद मिळून जीवन आणि मालमत्ता यांची कमीत कमी हानी व्हावी या दृष्टीकोनातून सर्व संबंधित संस्थामध्ये समन्वय साधणे
- विमोचन / सहाय्य कार्यवाहीचे नियंत्रण करणे

**२. उपरोक्त क्षेत्रांतील साध्यासाठी आगामी वर्षात खालील उपक्रम हाती घेण्याचे प्रस्ताविले आहे.**

| भर देण्यात आलेली क्षेत्रे | उपक्रम | तरतूदी (कोटीत) |
|---|---|---|
| अत्याधुनिक स्वयंपुर्ण निर्दोष संपर्क यंत्रणा विकसित करणे.<br><br>नैसर्गिक आपत्तीच्या काळात जेथे जेथे शक्य आहे तेथे सर्व सबंधितांना पुर्व सुचना देणे. | विश्वासार्ह संदेशवहन यंत्रणेच्या उभारणीमध्ये खालील बाबी असतील.<br>१. आपत्ती व्यवस्थापन माहिती प्रक्रिया (Online emergency) Suppport function management & mobile application सुरु करण्यात येणार असून सदरच्या प्रणाली मध्ये मोबाईल ॲप, सीटीझन रजिस्ट्रेशन बेवसाईट, SMS Alert संपूर्ण Disaster Maganement system. GST प्रणाली, सोशल मिडीया, मेंटेनन्स हार्डवेअर इ. अंतर्गत असणार आहे.<br>२. महापालिका क्षेत्रातील मनपा व खाजगी शाळा, महाविद्यालय, शिक्षक, शासकीय व निमशासकिय स्वयंसेवी संस्था, विद्यार्थी यांचेसाठी आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यक्रम राबविणे.<br>३. आपत्ती व्यवस्थापन कक्षाकडे अत्याधुनिक कटर्स, दिवे, बॅट-या, हत्यारे व अवजारे इ. साहित्य उपलब्ध करुन घेण्यात येणार आहेत.<br>४. आपत्ती मध्ये बचाव कार्य प्रभावीपणे पार पाडण्यासाठी तसेच कमीत कमी जागेत शिरु व हालचाल करु शकणारी रोबोटीक मशिनरी उपलब्ध करुन घेण्याचा मानस आहे.<br>५. विभागाचा आकृतीबंध अद्याप मंजूर नसल्याने दूरध्वनी चालक, डयुटी ऑफिसर तसेच साधन सामुग्री व मनुष्यबळ घेण्याकरीता निविदा मागविण्यात येणार आहेत.<br>६. मान्सून कालावधीत कक्षाच्या कामकाजाच्या सोईसाठी अतिरीक्त मनुष्यबळ उपलब्ध करुन घेण्यात येईल. | रु.५.०० |
| **अ.** नैसर्गिक किंवा मानवनिर्मित आपत्तीमध्ये जलद व प्रभावी प्रतिसाद | १. अत्याधुनिक उपकरणांनी सुसज्ज Emergency Operation Center सर्व प्रभाग समित्यांमध्ये स्थापन करणे.<br>२. अतिवृष्टीमुळे पुरपरिस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे. अशा ठिकाणी नागरिकांची जिवितहानी होऊ नये | रु. १ .०० |

| | | |
|---|---|---|
| मिळून जीवन आणि मालमत्ता यांची कमीत कमी हानी व्हावी या दृष्टीकोनातून सर्व संबंधित संस्थामध्ये समन्वय साधणे.<br>**ब.** विमोचन / सहाय्य कार्यवाहीचे नियंत्रण करणे. | याकरीता आऊटसोर्सिंगच्या माध्यमातुन पुरेसे कर्मचारी लाईफ बॉईज व सुरक्षा रिंगसह नेमले जातील.<br>३. साचलेल्या पाण्यासह चिखल, दगड इत्यादी सक्शन करणारे अत्याधुनिक असे १० पंप खरेदी करण्याचा मानस आहे.<br>४. पावसाळयात पाणी साचण्याची शक्यता असलेल्या ठिकाणी पूर्व तयारी म्हणून भाडे तत्वावर किमान २० पंप उपलब्ध करुन घेण्यात येणार आहेत.<br>५. नैसर्गिक व इतर आपत्तीच्या प्रसंगी शहरातील नागरिकांना सुरक्षित स्थळी हलविणे तसेच सदर ठिकाणी मदत सामुग्रीचे वाटप करणे, यास्तव मोठया आकारमानाचे निवारा शेडस् (Evacuation Center) तयार करण्यात येणार आहेत. | |
| ठाणे आपत्ती बचाव पथक | ६. NDRF च्या धर्तीवर ठाणे आपत्ती बचाव पथकाची स्थापता करण्यात येणार आहे. | रु.३.०० |

## ३. सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पीय अंदाजातील खर्चाच्या प्रस्तावित तरतुदी

**(रुपये कोटीत)**

| | |
|---|---|
| अ) महसुली अर्थसंकल्पीय अंदाज | रु.९.०० |
| **एकूण प्रस्तावलेली अर्थसंकल्पीय तरतूद** | **रु. ९.००** |

# सुरक्षा विभाग

## प्रस्तावित अर्थसंकल्पीय अंदाजातील तरतुदींची ठळक वैशिष्टये व महत्वाच्या निर्धारित फलश्रृती

**१.** महापालिका इमारती, कार्यालय, रुग्णालये, उद्याने, तलाव, जलकुंभ, मोकळे भुखंड, रेंटल हाऊस इत्यादीसारख्या महानगरपालिकेच्या मालमत्तेची संपुर्णतः सुरक्षिततेचे काम सुरक्षा विभागाकडून करण्यात येते. त्यानुसार खालील क्षेत्रावर भर देण्यात आलेला आहे.

- महानगरपालिकेच्या मालमत्तेची सुरक्षा वाढविणे.
- सुरक्षा दलाच्या कर्मचारी वर्गाच्या क्षमतेमध्ये वाढ करणे. तसेच त्यांना विशेष पोलीस अधिकारी यांचा दर्जा देणे.
- सुरक्षा विभागातील कर्मचा-यांची नवीन पदे निर्माण करुन सुरक्षा विभागाची पुनर्रचना करणे.

**२. उपरोक्त क्षेत्रांतील साध्यासाठी आगामी वर्षात खालील उपक्रम हाती घेण्याचे प्रस्ताविले आहे.**

| भर देण्यात आलेली क्षेत्र | उपक्रम | तरतुदी (कोटीत) |
|---|---|---|
| महापालिका मालमत्तेची सुरक्षा वाढ्विणे. | ठा.म.पा (मु.) व सर्व प्रभाग समितीच्या कार्यालयात बसविण्यात आलेल्या मेटल डोअर डिक्टेटर मशीन व सी सी टी व्ही कॅमेरे त्यांची देखभाल दुरुस्ती, नवीन मेंटलडोअर डिक्टेक्टर मशीन व सी.सी. टी.व्ही यंत्रणा बसविणे. | रु.०.५० |
| | सुरक्षा विभागाकरीता नवीन हत्यारे विकत घेणेबाबत | रु.०.१० |
| सुरक्षा विभागाकरीता कर्मचारी वर्गाच्या क्षमतेमध्ये वाढ करणेबाबत. | सुरक्षा अधिकारी पदाचे रिक्त पद कायमस्वरुपी त्वरीत भरणे. | |
| | सुरक्षा विभागातील आरक्षकांची ३४० रिक्त पदे त्वरीत भरणे. | |
| | सहा. सुरक्षा अधिकारी या संवर्गातील किमान १४ पदे मंजूर करुन त्वरीत भरणे. | |
| | खाजगी सुरक्षा रक्षकांमध्ये वाढ करुन येणाऱ्या पगार खर्चास व दर सहा महिन्यासाठी इतर भत्त्यात होणा-या वाढीसाठी तरतूद | रु.२१.०० |

**३. सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पीय अंदाजातील खर्चाच्या प्रस्तावित तरतुदी**

**(रुपये कोटीत )**

| | |
|---|---|
| अ) भांडवली अर्थसंकल्पीय अंदाज | रु. ०.६० |
| ब) महसुली अर्थसंकल्पीय अंदाज | रु. २१.१० |
| **एकुण प्रस्ताविलेली अर्थसंकल्पीय तरतुद (अ + ब )** | **रु. २१.७०** |

# <u>जवाहरलाल नेहरु नागरी पुनरुत्थान अभियान</u>

# एकात्मिक नाले विकास प्रकल्प

### प्रस्तावित अर्थसंकल्पीय अंदाजातील तरतुदींची ठळक वैशिष्टये व महत्वाच्या निर्धारित फलश्रृती

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १५३, १५४, १५५, १५६ व १५७ अन्वये पावसाळी पाण्याचा निचरा करणारे गटारे, नाले व तत्सम गोष्टी बांधणे व ते सुस्थितीत ठेवणे, त्यात फेरफार व सुधारणा करणे आणि पावसाळी पाण्याचा निचरा योग्य रीतीने व्हावा यादृष्टीने इतर उपाययोजना करणे हे महानगरपालिकेचे अनिवार्य कर्तव्य आहे.

**१.** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रातील समाविष्ट असलेल्या शहरांपैकी ठाणे हे विकसित शहर असून महाराष्ट्राची राजधानी मुंबई अगदी जवळ असल्याने येथे विविध औद्योगिक, नागरी व वाणिज्य सुधारणा होत आहेत.

ठाणे शहराचे वार्षिक सरासरी पर्जन्यमान २५०० मि.मी. एवढे आहे. ठाणे शहराचे उत्तर पूर्वेला असलेल्या संजय गांधी उद्यानाजवळील शहरातील मुख्य नाल्यांची सुरुवात होते आणि ८ ते ९ कि.मी. वाहत जाऊन अरबी समुद्र खाडीमध्ये मिळतात. सदरचे नाले हे दाट लोकवस्ती व झोपडपट्टी भागातून वाहून खाडीला जाऊन मिळतात. झोपडपट्टी भागातील मुख्य नाले अरुंदी आणि कमी खोलीचे आहे. बऱ्याच ठिकाणी नाल्याचा प्रवाहास सेवावाहिन्या यांच्यामुळे अडथळा निर्माण झालेला आहे. वरील कारणांमुळे झोपडपट्टी भागात पावसाळयात पाणी साठणे व पुर येण्याच्या घटना घडतात.

वाढती लोकसंख्या, वाढता विकासयामुळे रनऑफमधील वाढ, जमितीची धुप, नाल्यावरील अतिक्रमणे व विविध सेवाववाहिन्यामुळे नाल्याच्या प्रवाहाला होणारा अडथळा या सर्वामुळे पावसामध्ये झोपडपट्टी वसाहतीमध्ये व खाडी जवळील भागामध्ये पाणी साठणे, पुर येणे यामुळे संर्वजनिक स्वास्थ व वित्त आणि मनुष्यहानी होण्याचा धोका निर्माण होतो.

पाणी साठणे व परिस्थिती हाताळण्यासाठी पर्जन्य वाहिन्याचे गरजेनुसार सुव्यस्थित नियोजन, संकल्पन आणि त्याची पूर्तता करणे आवश्यक आहे.

ठाणे महानगरपालिका क्षेत्रात एकुण ७२ मुख्य नाले असून त्याची एकुण लांबी सुमारे १५३ कि.मी. आहे ठाणे महापालिकेने सन २०१७ पर्यंत सुमारे ८१ कि. मी. लांबीच्या नाले बांधकाम आर.सी.सी. पध्दतीने केलेले असून सन २०१७-१८ मध्ये सुमारे १३.२७ कि.मी. नाल्याचे बांधकाम करण्याची कामी हाती घेण्यात आलेली आहेत. अजुनही सुमारे ५८.८२ कि.मी. लांबीच्या जुन्या व मोडकळीस आलेल्या दगडी बांधकामातील नाल्याचा तसेच कच्चा नाल्याचे बांधकाम टप्पा टप्पाने करण्यात येणार आहे.

**२. प्रकल्पाची उद्दीष्टे**

ठाणे शहरातील पाणी साचण्यास प्रतिबंध करणे व पूरग्रस्त परिस्थिती टाळणे करीता योग्य प्रकारे पावसाळी पाण्याचा निचरा होण्यासाठी सुनियोजित पर्जन्यवाहिन्यांचे नियोजन, संकल्पन, विकास व बांधकाम करणे ही या प्रकल्पाची सर्वसाधारण उद्दिष्टे आहेत.

**३. प्रकल्पाचे फायदे**

- विविध सेवावाहिन्या नाल्यामधुन स्थलांरीत केल्यामुळे पावसाळी पाण्याचा निचरा योग्य करुन संकल्पन केल्याने अशा भागातील पावसाळी पाण्याचा निचरा योग्य रीतीने होत आहे असे मागील दोन वर्षाचा अनुभव आहे.
- खाडीकडील नाल्यांचे बांधकाम झाल्याने या भागात वॉटर लॉगिंग (पाणी तुंबणे) न झाल्याने या विभागातील शेत जमिनीस वारंवार दर पावसाळयात होणारे नुकसान मागील दोन वर्षात झालेले नाही.
- पावसाळी पाण्याचा निचरा योग्य रीतीने झाल्याने नागरीकांच्या आरोग्याचा स्तर उंचावला असून पावसाळयात होणाऱ्या साथीच्या रोगांचा प्रादुर्भाव कमी झाला आहे.
- पावसाळी पाण्याचा निचरा योग्य रीतीन न झाल्याने उद्‌भवणाऱ्या पुर परिस्थितीमुळे लोकांच्या संपत्तीस यापूर्वी निर्माण होणारा धोका कमी झाला आहे.
- नाल्यामधील अतिक्रमणे हटविण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे.
- दरवर्षी नाल्यांच्या देखभाल दुरुस्तीसाठी होणारा खर्च कमी झाला आहे.
- पावसाळी पाण्याचा निचरा योग्य रीतीने झाल्याने दरवर्षी पाणी तुंबून खराब होणाऱ्या रस्त्यांची दुरुस्तीचे प्रमाण कमी झाले आहे.

**४. सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पीय अंदाजातील खर्चाच्या तरतुदी**

| भांडवली अर्थसंकल्पीय अंदाज | तरतूद (कोटीत) |
|---|---|
| १. नाले बांधणे | रु.५०.०० |
| २. फ्लड गेट्स | रु.०.२५ |
| **एकुण** | रु. ५०.२५ |

## जवाहरलाल नेहरु नागरी पुनरुत्थान अभियान

### भुयारी गटार योजना

**प्रस्तावित अर्थसंकल्पीय अंदाजातील तरतुदींची ठळक वैशिष्टये व महत्वाच्या निर्धारित फलश्रृती**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १५४ मलजलाची विल्हेवाट लावणे या दृष्टीने इतर उपाययोजना करणे हे महानगरपालिकेचे अनिवार्य कर्तव्य आहे.

**१.** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रातील समाविष्ट असलेल्या शहरांपैकी ठाणे हे विकसित शहर असून, महाराष्ट्राची राजधानी मुंबई अगदी जवळ असल्याने येथे विविध औद्योगिक, नागरी व वाणिज्य सुधारणा होत आहेत.

ठाणे शहराची सरासरी लोकसंख्या १७ लक्ष असून, येत्या ३० वर्षात ही लोकसंख्या सुमारे ३७ लक्ष होणार आहे. वाढत्या लोकसंख्येनुसार दैनंदिन गरजेसाठी लागणारे पाणी पुरवठ्यानुसार मलजलाची निर्मिती होते. त्यावेळीच त्याची विल्हेवाट लावणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने सन २०३६ च्या होणाऱ्या लोकसंख्येचा विचार करून ठाणे महानगरपालिका क्षेत्रात जवाहरलाल नेहरु नागरी पुनरुत्थान अभियाना अंतर्गत केंद्र व राज्य शासनाच्या अर्थसहाय्याने तीन टप्प्यात भुयारी गटार योजना हाती घेण्यात आली. सदर योजने अंतर्गत सुमारे २०० कि.मी. लांबीची मलवाहिनी २० मलउदंचन केंद्र व ६ मलप्रक्रिया केंद्र बांधण्यात आलेले आहेत. सदर योजनेचे बहुतांश काम पूर्ण झालेले असून २ मलप्रक्रिया केंद्र व ९ मलउदंचन केंद्र कार्यान्वित करण्यात आलेले आहेत. उर्वरित ४ मलप्रक्रिया केंद्र व मलउदंचन केंद्रांची स्थापत्य कामे पूर्णत्वास आली असून यांत्रिकी व विद्युतीकरणाची कामे प्रगती पथावर आहेत. मलवाहिनींची गॅप कनेक्टिव्हिटीची कामे ट्रेंचलेस व ओपन कट

पद्धतीने हाती घेण्यात आली असून ही कामे सुध्दा प्रगती पथावर आहेत. ही संपूर्ण योजना सन २०१८-१९ या वर्षात पूर्ण करून कार्यान्वित करण्यात येणार आहे.

भुयारी गटार योजना टप्पा क्र. ४ अंतर्गत ठाणे महापालिका क्षेत्रातील घोडबंदर रोड (मानपाडा पासून गायमुख पर्यंत ) परिसरामध्ये सुमारे १० लक्ष लोकसंख्ये करिता भुयारी गटार योजना राबविण्याचे काम महापालिकेने हाती घेतले असून सदर योजने मध्ये एकुण ६६ द.ल.लि. क्षमतेचे २ मलप्रक्रिया केंद्र ५ मल उदंचन केंद्र व ९२ कि. मी. लांबीची मलवाहिनी टाकणेचा समावेश आहे सदर योजनेस अमृत अभियाना अंतर्गत केंद्र शासनाने मान्यता दिलेली आहे. सदर योजने करिता केंद्र व राज्य शासना कडून सुमाने ५० % अनूदान प्राप्त होणार आहे. या योजनेस अंदाजे रु. २०० कोटी खर्च येणार असून सदर योजनेचे काम सुरु करण्यात आलेले आहे. पुढील ३ वर्षात ही योजना पूर्ण करण्याचा महापालिकेचा प्रयत्न आहे.

भुयारी गटार योजना टप्पा क्र. ५ अंतर्गत ठाणे महापालिका क्षेत्रातील दिवा, शिळ परिसराचा समावेश असून त्याचा सविस्तर प्रकल्प तयार करण्यात आला आहे. सदर योजनेस मा. महासभेने मान्यता दिलेली आहे. योजनेस शासनाचा अर्थसहाय्य करण्यात आला असून महापालिकेस प्रयत्न करण्यात आले. तथापि शासनाकडून अर्थसहाय्य उपलब्ध होऊ न शकल्याने सदर योजना महापालिकेचा निधीतून करण्याचे विचाराधीन आहे. सदर योजनेस अंदाजे रु. २३५ कोटी खर्च येणार असून सन २०१८-१९ या वर्षात आर्थिक नियोजन करून सदर प्रकल्प हाती घेण्यात येणार आहे.

**२. प्रकल्पाचे फायदे**

- या परिसरातील सेप्टीक टँक बंद होऊन मलजल महापालिकेच्यं मलवाहिनीत जोडता येईल.
- सेप्टिक टँक बंद झाल्याने गटारा मधून वाहणारे पाणी/ मलजल कमी होणार आहे.
- गटरा मधून वाहणारे पाणी / मलजल कमी झाल्याने परिसरात येणारी दुर्गंधी कमी होईल व ग्राऊंण्ड वॉटर दुषित होणार नाही.

**३. सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पीय अंदाजातील खर्चाच्या तरतुदी**

| **भांडवली अर्थसंकल्पीय अंदाज** | **तरतूद (कोटीत)** |
|---|---|
| १. भुयारी गटार योजना टप्पा क्र. १ | रु. २८.०० |
| २. भुयारी गटार योजना टप्पा क्र. २ | रु. ४२.०२ |

| **भांडवली अर्थसंकल्पीय अंदाज** | **तरतूद (कोटीत)** |
|---|---|
| ३. भुयारी गटार योजना टप्पा क्र. ३ | रु. ७.२५ |
| ४. अमृत योजना | रु. १०२.३७ |
| ५. मलवाहिनी टाकणे व हाऊस कनेक्शन करणे | रु. ४०.०० |
| ६. सांडपाणी पुनर्वापर प्रकल्प | रु. ०.५० |
| ७. भुयारी गटार योजना क्र. ५ | रु. २५.०० |

# जेंडर बजेट

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६३ व ६६ या कलमान्वये महानगरपालिकांची कर्तव्य निर्धारित करण्यात आलेली आहेत. यामध्ये स्वेच्छाधिन व आवश्यक कर्तव्य दिलेली आहेत. याची अंमलबजावणी १००% करण्याचा प्रयत्न महापालिका असलेल्या उपलब्ध निधीतून करीत असते आतापर्यंत शासन स्तरावर महिलांचे व बालकांचे विकासासाठी निरनिराळ्या योजना राबविण्यात येतात. त्याच धर्तीवर ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील महिलांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी व जास्तीत जास्त गरीब व गरजू महिलांना त्यांचा लाभ व्हावा व त्याचे जीवनमान उंचावून त्यांना स्वावलंबी करण्यासाठी सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पामध्ये महिलांसाठी ठोस कार्यक्रम / योजना यांचे नियोजन करावे या हेतुने याबाबत स्वतंत्र तरतुदी अंतर्गत राबवयाच्या योजनाबाबत थोडक्यात तपशील देण्यात आलेला आहे. सन २०१८-१९ चे अर्थसंकल्पीय अंदाजात विविध योजनांसाठी महिला व बालकांना केंद्रस्थानी ठेवून केलेल्या तरतुदी जेंडर बजेट खालील स्वतंत्र दर्शविण्यात आलेल्या आहेत. यामुळे ठाणे महापालिका क्षेत्रातील महिलांच्या कौटुंबिक व आर्थिक परिस्थितीत व आरोग्यात सुधारणा होवून त्या स्वावलंबी होण्यास मदत होईल अशी अपेक्षा आहे.

# सन २०१८-१९ मधील महिला व बालकल्याण कार्यक्रमाच्या तरतुदी

**(रकमा लाखात)**

| अ.क्र. | तपशील | सन २०१८-१९ मधील प्रस्तावित तरतुदी |
|---|---|---|
| | बांधील खर्च वजा जाता निव्वळ महसूल | ७५७६३.१० |
| | ५% रक्कम | ३७८८.१६ |
| १ | महिला व बालकल्याण कार्यक्रम | ३७००.०० |
| २ | प्राथमिक शिक्षणाकडील विविध योजना | ५०००.०० |
| ३ | प्राथमिक शिक्षणाकडील मागासवर्ग विदयार्थ्यांसाठी विविध योजना | ५००.०० |
| ४ | मानपाडा परिसरात महिलांसाठी व्यायामशाळा बांधणे | ५०.०० |
| ५ | उद्यानात खेळणी बसविणे | १५०.०० |
| ६ | खेळणी व शैक्षणिक साहित्य खरेदी | ८.०० |
| ७ | महिलांसाठी स्वच्छतागृह बांधणे | १००.०० |
| ८ | सार्वजानिक शौचालय व मुताऱ्या बांधणे | ६४०.०० |
| ९ | गर्भवती महिलांना संतुलित आहार व प्रोटीन्स | २००.०० |
| १० | स्त्रियांसाठी कर्करोग निदान केंद्र व उपचार | २००.०० |
| ११ | लहान मुलांच्या कर्करोगावर उपचार | ५०.०० |
| १२ | एमसीटीएस कार्यक्रम राबविणे (माता बालसंगोपन) | १००.०० |
| १३ | आयईसी कार्यक्रम | २५.०० |
| १४ | आरोग्य तपासणी व जनजागृती | १००.०० |
| १५ | तेजस्विनी बसेस खरेदी | ६००.०० |
| १६ | सुदृढ मातृत्व योजना | २००.०० |
| १७ | गर्भवती महिलांची सोनोग्राफी करणे | २००.०० |
| १८ | प्रसुतीपुर्व बाळाच्या तपासण्या | १००.०० |
| १९ | किशोरवयीन मुलींना रुबेला लस उपलब्ध करणे | १००.०० |
| २० | बेटी बचाओ व बेटी पढाओ अभियान | ४००.०० |
| २१ | हिरकरणी योजना | १००.०० |
| | **एकूण महिला व बालकल्याणवरील खर्च** | **१२५२३.००** |

# शिक्षण विभाग

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ६३ व ६६ कलमान्वये महापालिकांची कर्तव्ये निर्धारत करण्यात आलेली आहेत. यामध्ये स्वेच्छाधिन व आवश्यक कर्तव्ये दिलेली आहेत. याची अंमलबजावणी १००% करण्याचा प्रयत्न महापालिका असलेल्या उपलब्ध निधीतून करीत असते. आतापर्यंत प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांच्या विकासाकरीता निरनिराळया योजना राबविण्यात येतात. त्याच धर्तीवर विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास होण्यासाठी व जास्तीत जास्त गरीब व गरजू विद्यार्थ्यांना त्याचा लाभ व्हावा व त्याचे जीवनमान उंचावून त्यांना स्वावलंबी करण्यासाठी सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पामध्ये ठोस कार्यक्रम योजना यांचे नियोजन करावे व या हेतूने याबाबत स्वतंत्र तरतूदी अंतर्गत राबवायच्या योजनांबाबत थोडक्यात तपशिल देण्यात आला आहे. सन २०१८-१९ अर्थसंकल्पीय अंदाज विविध योजनांसाठी शालेय विद्यार्थ्यांना केंद्रस्थानी ठेवून केलेल्या तरतूदी जेंडर बजेटखाली स्वतंत्र दर्शविण्यात आलेल्या आहेत.

| **अ.क्र.** | **योजनेचे नाव** | **आर्थिक लक्ष** |
|---|---|---|
| | **विविध शालेय योजना, स्पर्धा - कार्यक्रम इत्यादी** | - |
| | **(अ) नियमित योजना** | |
| **१** | विज्ञान प्रदर्शन | ४.५० |
| **२** | शिक्षक दिन | ३.५० |
| **३** | क्रीडा महोत्सव | ८.२५ |
| **४** | सांस्कृतिक महोत्सव | ७.२५ |
| **५** | ग्रंथालय पुस्तके / शालेय मासिके व ई- लायब्ररी | २५.०० |
| **६** | स्व.मो.दा.जोशी योजोअंतर्गत अपघात विमा योजना | १८.०० |
| **७** | सिगल शाळा | १५.०० |
| **८** | अनुताई वाघ बाल उत्कर्ष योजना | ३.०० |
| **९** | स्काऊट गाईड कॅम्प, प्रशिक्षण, गणवेष व इतर साहित्य | १०.०० |
| **१०** | सी.सी.टिव्ही कॅमेरे खरेदी | १०.०० |

| | | |
|---|---|---|
| **११** | फेस रिडींग मशिन खरेदी | ३१.४५ |
| **१२** | शिक्षक / विद्यार्थी विविध स्पर्धा | २.०० |
| **१३** | शाळा व कार्यालय फर्नीचर | ५०.०० |
| | **(ब) नियमित योजना** | |
| | **पौष्टीक आहार (बालवाडी ते माध्यमिक सर्व माध्यम)** | ७५०.०० |
| **१४** | वॉटरबॅग / लंचबॉक्स (बालवाडी ते प्राथमिक) | ३०.०० |
| **१५** | प्रशपत्रिका - उत्तरपत्रिका छपाई/ स्पर्धा परिक्षा | २००.०० |
| **१६** | शाळा व कार्यालय छपाई | ४५.०० |
| | **(ब) (२ ) DBT अंतर्गत लाभ द्यावयाच्या योजना** | |
| **१७** | गणवेष मुली (बालवाडी ते प्राथमिक) | २२५.०० |
| **१८** | गणवेष मुले (बालवाडी ते प्राथमिक) | १२५.०० |
| **१९** | दप्तर (बालवाडी ते प्राथमिक) | ७५.०० |
| **२०** | पी.टी. गणवेष व इतर साहित्य | १६५.०० |
| **२१** | वहया (चित्रकला, प्रयोगवहया) | १००.०० |

| | | |
|---|---|---|
| | **(ब) (२ ) DBT अंतर्गत लाभ द्यावयाच्या योजना** | |
| **१** | शैक्षणिक साहित्य | ७५.०० |
| **२** | शुज व मोजे | ९०.०० |
| **३** | रोकोट | १२५.०० |
| **४** | मुले व मुलींसाठी स्वेटर | १७५.०० |
| | **(क) नाविण्यपूर्ण योजना** | |
| | **(अ) जलद प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र** | |
| **५** | डिजिटल स्कुल | १२००.०० |
| **६** | टॅब | ३००.०० |
| **७** | Wifi system install in schools | १००.०० |
| **८** | शैक्षणिक दृष्टया आदर्श शाळा | ५०.०० |
| **९** | व्हर्च्युअल क्लासरुम देख्रभाल दुरुस्ती व टप्प २ | १००.०० |
| **१०** | ज्ञानरचना वाद | ५.०० |
| | **(ब) साक्षर ठाणे** | |
| **११** | प्लॅटफॉर्म स्कूल , मुंब्रा | २०.०० |

| | | |
|---|---|---|
| १२ | नाका शाळा | ४०.०० |
| १३ | इंटरनेट सखी | ५.०० |
| १४ | प्रौढ शिक्षण | २५.०० |
| १५ | कवितेची बाग | ५.०० |
| १६ | सुदृढ बालक (हॅण्ड सॅाटिायझर यंत्र लिक्विडसह पुरविणे) | १८.०० |
| | **(ड) इतर नाविण्यपूर्ण योजना** | |
| १७ | नागरी शिक्षण प्रशिक्षण व संशोधन केंद्र निर्मिती | २०.०० |
| १८ | शैक्षणिक सहकार्य सेतू | ५०.०० |
| १९ | शाळा सिध्दी | १०.०० |
| २० | प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र | २५.०० |
| २१ | सर्व शाळासाठी संगणक व प्रिटंर व बॅटरी बॅकअप खरेदी | १२०.०० |
| २२ | क्रिडा साहीत्य खरेदी व क्रीडा /कला शिक्षकांचे मानधन | २५.०० |
| २३ | कला साहित्य खरेदी व मानधन | २०.०० |
| २४ | प्रयोगशाळा नुतनीकरण व उपकरणे खरेदी (विज्ञान कोपरा) | ५०.०० |
| २५ | खेळाची मैदाने विकसित करणे | ५०.०० |
| २६ | वॅाटर प्युरीफायर खरेदी | २५.०० |
| २७ | अभ्यासिका केंद्र | २५.०० |
| २८ | तंत्रस्नेही प्रशिक्षण | २०.०० |
| २९ | अग्नीशमन यंत्र खरेदी | २५.०० |
| ३० | स्वयंसंरक्षण प्रशिक्षण योजना (कराटे प्रशिक्षण) | २५.०० |
| ३१ | विद्यार्थी नामदर्शिक पट्टी पुरविणे | १२.५० |
| ३२ | वासंतिक वर्ग | २.०० |
| ३३ | विद्यार्थी विकास निर्देशांक योजना | २५५.०० |
| ३४ | कला प्रशिक्षण व बालरंगकर्मी नांदी योजना | ५०.०० |
| ३५ | माध्यमिक शाळा विद्यार्थी गुणवत्तावाढीसाठी शिबीर | १५.०० |
| ३६ | क्रीडा गणवेश (पूर्व प्राथमिक , प्राथमिक व माध्यमिक) | २००.०० |
| ३७ | माध्यमिक शाळांसाठी माध्यान भोजन सुरु करणे | ७५.०० |
| ३८ | विशेष फेरी बस सेवा | १००.०० |
| ३९ | फुटबॉल प्रशिक्षण व शिष्यवृत्ती | ५०.०० |
| ४० | अक्षयपात्र टप्पा - २ व ३ | १०.०० |
| ४१ | स्डुडंड इर्फमेशन कार्ड (Student Information Card) | ५०.०० |
| ४२ | कमी पट होत असलेल्या शाळांच्या इमारतीत संयुक्त प्रकल्प | २०.०० |

| | | |
|---|---|---|
| | या तत्वावर इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरु करणे. | |
| **४३** | गणित लॅब तयार करणे | २५.०० |
| **४४** | शाळांमध्ये (Central) केंद्रीय ध्वणीप्रक्षेपण यंत्रणा बसविणे | ७५.०० |
| **४५** | टॉय लायब्ररी व नवीन बालवाडी वर्गाची निर्मिती | ५०.०० |
| **४६** | छात्रसेना | ४०.०० |
| **४७** | शिक्षक प्रोत्साहन योजना | १०.०० |
| **४८** | अध्यापन संशोधन केंद्र | १००.०० |
| **४९** | साहसी खेळ (ॲडव्हेंचर क्लब) | १००.०० |
| **५०** | स्पोकन इंग्लीश | १००.०० |
| **५१** | योगा ॲकेडमी | २५.०० |
| **५२** | शाळा इमारतींमध्ये अग्निशमन यंत्रणा बसविणे | १५०.०० |
| **५३** | पोनिक्स साहित्य | २५.०० |
| **५४** | स्मार्ट गर्ल योजना | ५०.०० |
| **५५** | वस्तीशाळा | १००.०० |
| **५६** | पालक बंधन योजना | ५०.०० |
| **५७** | व्यवसाय मार्गदर्शन (Skill Development) | २०.०० |
| **५८** | शिक्षकेत्तर कर्मचारी नेमणूक (मानधन तत्वावर) | १००.०० |
| **५९** | शिक्षक नेमणूक (मानधन तत्वावर) | १५०.०० |
| **६०** | **(इ) झेप** | |
| **६१** | दिव्यांगांसाठी रिसोर्स सेंटर सुरु करणे | ५.०० |

## उदयान विभाग

- लहान मुलांच्या मनोरंजन व विरंगुळयासाठी आल्हाददायक उद्यानांची निर्मिती.
- लहान मुलांच्या मनोरंजनासाठी उद्यानांमध्ये अद्ययावत खेळणी संच बसविल्याने ठाणे शहरातील लहान मुलांना त्याचा लाभ होईल. यासाठी सन २०१८-१९ मध्ये रु.१.५० कोटीची तरतूद करण्यात आली आहे.

# नागरी दुर्बल घटकांसाठी "पी" बजेट

महाराष्ट्रात नव्हे तर देशातच प्रत्येक मोठया शहरांमध्ये नागरी दुर्बल घटकांचे प्रमाण थोडया अधिक प्रमाणामध्ये आहे. नागरी दुर्बल घटकांना मुलभूत सुविधा पुरविणे. त्यांचे आरोग्यमान उंचावणे या बरोबरच त्यांना आपल्या शहरामध्ये स्वावलंबी बनविणे हे महानगरपालिकेचे आद्य कर्तव्य आहे. त्याचप्रमाणे कायद्यानेही बंधनकारक आहे. या लोकांच्या सुखसोयीसाठी महानगरपालिकेच्या सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये जास्तीत जास्त तरतूद करण्यांत आलेली आहे. या तरतुदींचा पुरेपूर नियोजनबध्द खर्च करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

नागरी दुर्बल घटकांसाठी महापालिकेच्या अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये विविध योजनांचा समावेश केलेला आहे हे ठळकपणे दृष्टीपथात येवून त्यावर लक्ष केंद्रीत व्हावे व केलेल्या तरतुदींचा पूर्णपणे विनियोग होवून नागरी दुर्बल घटकांचे राहणीमान उंचावे हा हेतू ठेवून दुर्बल घटकांसाठी पी बजेट स्वतंत्र दर्शविण्यात आले आहे.